सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. ०३ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १२२ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पुण्यातील जातीय हिंसाचारावर कारवाई
## ५०० जणांविरुद्ध गुन्हा दाखल, १७ जणांना अटक, कलम १६३ लागू...

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यामधील यवत गावात शुक्रवारी एका सोशल मीडिया पोस्टमुळे उसळलेल्या जातीय हिंसाचार संदर्भात पोलिसांनी आतापर्यंत ५०० हून अधिक लोकांविरुद्ध पाच एफआयआर दाखल केले आहेत. हिंसाचार आणि जाळपोळीच्या घटनांप्रकरणी १७ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे, तर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या तरुणाला देखील अटक करण्यात आली आहे.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, शुक्रवारी दुपारी एका तरुणाने सोशल मेसेजिंग प्लॅटफॉर्मवर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यानंतर गावात जातीय तणाव पसरला. यामुळे संतप्त झालेल्या लोकांनी तोडफोड करायला सुरुवात केली, दरम्यान अनेक वाहने आणि सार्वजनिक मालमत्तेची हानी केली. घटनेदरम्यान, हल्लेखोरांनी मोटारसायकल, दोन कार, धार्मिक स्थळ आणि बेकरीचे नुकसान केले आणि आग लावली. पोलिसांनी तात्काळ परिस्थिती नियंत्रणात आणली आणि गावात शांतता प्रस्थापित झाली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रूधुराचा आणि लाठीचार्ज चा वापर करावा लागला.

पीटीआय या वृत्तसंस्थेच्या म्हणण्यानुसार, यवत पोलिस ठाण्याच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, आतापर्यंत हिंसाचाराशी संबंधित पाच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी चार गुन्हे हिंसाचार, जाळपोळ आणि मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या ५०० हून अधिक लोकांविरुद्ध दाखल आहेत. त्यापैकी १०० हून अधिक जणांची ओळख पटली आहे आणि १७ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

धार्मिक भावना दुखावणारी पोस्ट टाकणाऱ्या तरुणाविरुद्ध एफआयआर देखील दाखल करण्यात आला आहे आणि त्याला अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी सांगितले. त्याने शेअर केलेला मजकूर दुसऱ्या राज्यातील एका घटनेवर आधारित होता.

कलम १४४ आणि एसआरपीएफ तैनात

पुण्याचे पोलिस अधीक्षक संदीप सिंग गिल म्हणाले की, सुरुवातीच्या तपासात कोणताही पूर्वनियोजित कट रचल्याचे दिसून आले नाही. गावातील परिस्थिती आता नियंत्रणात आहे. मोठ्या संख्येने पोलिस दल आणि राज्य राखीव पोलिस दल (एसआरपीएफ) तैनात करण्यात आले आहे. बीएनएसच्या कलम १४४ आणि बीएनएसएसच्या कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. असे त्यांनी पुढे माहिती दिली. अतिरिक्त पोलिस अधीक्षक गणेश बिरादार म्हणाले, गावावर ड्रोनद्वारे लक्ष ठेवले जात आहे आणि सोशल मीडियावरील क्रियाकलापांवरही विशेष लक्ष दिले जात आहे.

कठोर कारवाई : मुख्यमंत्री

पुणे दौंड दौऱ्यावर असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घटनेचा निषेध करत म्हणाले, मध्य प्रदेशातील एका घटनेशी संबंधित एका हिंदू पुजारीबद्दल एका तरुणाने आक्षेपार्ह पोस्ट केली, ज्यामुळे गावात संताप निर्माण झाला. काही लोक जाणूनबुजून अशा पोस्ट करून तणाव पसरवू इच्छितात. त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही गावाला भेट दिली आणि पोस्ट टाकणारा तरुण नांदेडचा रहिवासी आणि रोजंदारीवर काम करणारा असल्याचे सांगितले जाते.

# पतीची न्यायालयीन कोठडीत रवानगी, रोहिणी खडसेंनी घेतली शरद पवारांची भेट



पुणे : पुण्यातील खराडी परिसरातल्या रेव्ह पार्टीवर पोलिसांनी धाड टाकली. घटनास्थळावरुन अमली पदार्थ जप्त केले. या प्रकरणात शरद पवार समर्थक रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर याला अटक झाली. कोर्टाने प्रांजलची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली. यानंतर रोहिणी खडसे यांनी शरद पवारांची भेट घेतली. ही भेट पक्ष संघटनेतील कामाबाबत होती, असे रोहिणी खडसे यांनी सांगितले. अधिवेशन काळात शरद पवारांसोबत काही मुद्यांवर चर्चा राहून गेली होती. याच कारणामुळे संघटनेशी संबंधित कामांसाठी मार्गदर्शन घेण्याकरिता शरद पवारांना भेटल्याचे रोहिणी खडसे म्हणाल्या.

प्रांजल खेवलकर सध्या न्यायालयीन कोठडीत आहे आणि अद्याप त्याने जामिनासाठी अर्ज केलेला नाही. ही संपूर्ण न्यायालयीन प्रक्रिया आहे. यावर न्यायालयाबाहेर बोलणे योग्य होणार नाही; असे सांगत रोहिणी खडसेंनी प्रांजलबाबतच्या मुद्यावर प्रसारमाध्यमांशी बोलणे टाळले. योग्य वेळी योग्य ठिकाणीच या विषयावर बोलेन, असे रोहिणी खडसे म्हणाल्या.

पुणे पोलीस आयुक्तालयात रोहिणी खडसे आणि प्रांजल यांची भेट झाली. रोहिणी यांनी पुण्याच्या पोलीस आयुक्तांशीही चर्चा केली. यानंतर रोहिणी खडसेंनी शरद पवारांशीही वेळ मागून घेऊन चर्चा केली. यामुळे प्रांजल प्रकरणात पुढे काय होणार याकडे अनेकांचे लक्ष आहे.

# पाकिस्तानमधून राम मंदिर उडवण्याचा मेसेज; गुन्हा दाखल

बीड : उत्तर प्रदेशातील अयोध्येतील श्री राम मंदिर उडवण्याचा मेसेज थेट पाकिस्तानातून बीड जिल्ह्यातील एका तरुणाला आला. या प्रकरणात, तरुणाने शिरूर कासार पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल केली आहे. शिरूर कासार पोलीस ठाण्याचे पथक या प्रकरणाचा तपास करत आहेत.

पोलीस अधिकाऱ्याने शनिवारी सांगितले की, पाकिस्तानमधून आलेल्या या संदेशात तक्रारदार तरुणाला मंदिर उडवण्यासाठी एक लाख रुपयांची ऑफर देण्यात आली आहे आणि या संदेशात असेही नमूद केले आहे की कटात सामील होण्यासाठी आणखी ५० लोकांची आवश्यकता आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, मेसेजच्या ऑडिओ क्लिपमध्ये संशयिताने म्हटले आहे की, आम्हाला सांगा, आम्हाला पाठिंबा द्या, तोंड उघडा, तुम्हाला पैशांची गरज आहे. अयोध्येचे मंदिर आरडीएक्सने उडवायचे आहे. या कामासाठी आम्हाला पन्नास माणसांची गरज आहे, आरडीएक्स पोहोचवेल, जो कोणी काम करेल त्याला प्रत्येकी एक लाख रुपये मिळतील. जर तुम्ही ते करू शकत नसाल तर तुम्ही इतर कोणताही नंबर देऊ शकता.

पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, तक्रारदार तरुणाला पटवून देण्यासाठी संशयिताने कराचीमधील एका ठिकाणाचे लोकेशन देखील पाठवले आहे. हा संदेश पाठवणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि सखोल चौकशी सुरू आहे.

# मुंबईत मलेरिया, डेंग्यू आणि चिकनगुनियाचे रुग्णसंख्या वाढल्याने महानगरपालिका सतर्क

मुंबई: शहरात गेली अनेक दिवसांपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे साथीच्या आजारांनी देखील डोकं वर काढलं आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळ्यात मलेरिया, डेंग्यू आणि चिकनगुनियासारख्या साथीच्या आजाराचे रुग्ण झपाट्याने वाढत चालले आहेत. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेचे आरोग्य विभाग सतर्क झाले आहेत. शिवाय, नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असा इशारा पालिकेकडून देण्यात आला आहे.

पावसामुळे शहरात ठिकठिकाणी पाणी साचल्याने मच्छरवाढीस अनुकूल वातावरण तयार झाले आहे, हेच या साथीमागील मुख्य कारण मानले जात आहे.



मुंबई महानगरपालिकेने नागरिकांसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. यामध्ये घरात आणि आजूबाजूला साचलेलं पाणी हटवणं, मच्छरदाणीचा वापर, उकळलेलं पाणी पिणं, रस्त्यावरील अन्नपदार्थ टाळणं आणि ताप आल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घेणं अशा बाबींचा समावेश आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत यंदा साथीच्या आजाराचे प्रकरण दुप्पटीने वाढले

मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य अहवालानुसार, यावर्षी मलेरियाचे रुग्ण ४,१५१ पर्यंत पोहोचले आहेत, जे मागील वर्षी याच कालावधीत २,८५२ होते. डेंग्यूचे रुग्णदेखील ९६६ वरून १,१६० पर्यंत वाढले असून, फक्त जुलैच्या दुसऱ्या पंधरवड्यातच ४२६ नवीन रुग्ण आढळले आहेत. तर कनगुनियाचे प्रमाण देखील चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. गेल्या वर्षी फक्त ४६ रुग्ण होते, मात्र यावर्षी २६५ रुग्णांची नोंद झाली आहे. यातील ८६ रुग्ण फक्त मागील पंधरवड्यात आढळले आहेत.

याशिवाय, हॅपेटायटीस ए आणि ई या आजारांचं प्रमाण देखील वाढले आहे. जानेवारी ते जुलै २०२५ या कालावधीत हॅपेटायटीसचे ६१३ रुग्ण आढळले आहेत. लेप्टोस्पायरोसिस आणि गॅस्ट्रोएन्टेरिटिसचे प्रमाण काहीसे कमी झाले असले, तरी नागरिकांनी काळजी घेणे अत्यावश्यक आहे.

महानगरपालिकेने 'आपली चिकित्सा योजना' पुन्हा सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत सामान्य रक्त तपासणी, लघवी तपासणी, ताप व संसर्गजन्य आजारांवरील चाचण्या कमी किमतीत उपलब्ध आहेत. तपासणीचे निकाल व्हॉट्सपवरही उपलब्ध होतील, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

# मस्कच्या 'स्टारलिंक'ला भारतात परवाना
## आता प्रत्येक गावात पोहोचणार थेट इंटरनेट

नवी दिल्ली : अमेरिकन अब्जाधीश उद्योगपती एलन मस्क यांची कंपनी स्टारलिंक आता भारतात उपग्रह-आधारित इंटरनेट सेवा सुरू करण्याच्या तयारीत आहे. केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी या वृत्ताला दुजोरा दिला असून, स्टारलिंकला भारतात सेवा सुरू करण्यासाठी एकात्मिक परवाना देण्यात आल्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे देशातील दुर्गम खेडी आणि शहरांमधील इंटरनेट कनेक्टिव्हिटीमध्ये मोठी क्रांती घडण्याची शक्यता आहे.




देशातील पहिल्या मोबाइल कॉलला ३० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी ही घोषणा केली. ते म्हणाले, 'स्टारलिंकला भारतात उपग्रह इंटरनेट सेवा सुरू करण्यासाठी एकात्मिक परवाना देण्यात आला आहे.

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या प्रचाराचा उत्साहात शुभारंभ
# सभासदांच्या हितासाठीच आम्ही कायम कटिबद्ध- विनोद सामत

### वैद्यनाथ को - ऑपरेटिव्ह बँक संचालक मंडळ निवडणूक

परळी वैजनाथ : सभासदांच्या हितासाठी आम्ही कायम कटिबद्ध असून येथून पुढेही ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेची उत्तरोत्तर प्रगती करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत असे प्रतिपादन वैद्यनाथ को - ऑपरेटिव्ह बँकेचे विद्यमान चेअरमन विनोद सामत यांनी बँक निवडणूक प्रचाराच्या शुभारंभ प्रसंगी बोलताना केले. यावेळी बँकेचे सभासद मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँक संचालक मंडळ २०२५ च्या निवडणुकीत राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे व आ..धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल स्थापन करण्यात आले असून पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ मोंढा विभागातील श्री संकट मोचन हनुमान मंदिर येथे श्रीफळ वाढवून करण्यात आला. त्यानंतर सर्व उमेदवारांनी गोपीनाथ गड येथे जाऊन लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन प्रसाराला सुरुवात केली. यावेळी बोलताना बँकेचे विद्यमान अध्यक्ष विनोद सामत म्हणाले की वैद्यनाथ बँकेने सर्व सभासदांच्या विश्वासावर आणि सहकार्यावर मोठी प्रगती केली आहे. प्रारंभी लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने यशोशिखर गाठले आहे तर आता राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने यशाची घोडदौड कायम ठेवली आहे. आगामी काळातही ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बँक प्रगती करीत राहील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. बँकेच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सभासदाच्या हितासाठी या निवडणूकीत लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलचे उमेदवार विद्यमान अध्यक्ष विनोद सामत, उपाध्यक्ष रमेशराव कराड, विजयकुमार वाकेकर, अमोल डुबे, कुलभूषण जैन, प्रकाश जोशी, डॉ. राजाराम मुंडे, संदीप लाहोटी, प्रवीण देशपांडे, माहेश्वर निर्मळे, राजेंद्र लोमटे, सुशांत लोमटे, मनमोहन कलंत्री यांच्यासह भाजपा - राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), शिवसेना (शिंदे) व मित्र पक्षाचे जेष्ठ नेते विकासराव डुबे, जुगलकिशोर लोहिया, ज्ञानोबा माऊली फड, श्रीराम मुंडे, विजयकुमार मेनकुदळे, पांडुरंग सोनी, वैजनाथ सोळंके, बाजीराव धर्माधिकारी, प्रा. माधुकर आघाव, शांतीलाल जैन, सुरेश टाक, बालाजी (पिंटू) मुंडे, माऊली मुंडे, वसंत निर्मळ, सौ. उमाताई समशेट्टी, महादेव इटके, रविंद्र परदेशी, नितीन ढाकणे, लक्ष्मीकांत कराड, प्रा. दासू वाघमारे, अनिल तांदळे, तानाजी व्हावळे, दत्ताभाऊ सावंत, उमेश खाडे, प्रा. विनोद जगतकर, कुमार व्यवहारे, नितीन कुलकर्णी, नंदकिशोर बियाणी, गरूड, संगमेश्वर फुटके, सौ. देशपांडे, सौ. चंदा ठोंबरे, सौ. वर्षा जोशी, नानासाहेब कवडे, अश्विन मोगरकर, प्रितेश तोतला, अनिश अग्रवाल, प्रशांत कराड, योगेश मेनकुदळे, सुशील हरंगुळे, जगदीश लड्डा, पिंटू वाघमारे, बाळू फुले, अरुण साबू, जगदीश मंत्री, नागनाथ मुंडे, अच्युत जोगदंड, पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी व बँकेचे सभासद उपस्थित होते.

# महाराष्ट्रात ४.१७ कोटींची बेनामी मालमत्ता उघड!

मुंबई : महाराष्ट्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने यावर्षी भ्रष्ट लोकसेवक आणि खाजगी व्यक्तींविरुद्ध चार बेहिशेबी मालमत्ता प्रकरणे दाखल केली आहेत, ज्यात एकूण ४.१७ कोटी रुपयांची मालमत्ता गुंतलेली आहे. एसीबीच्या आकडेवारीनुसार, दोन वर्ग-१ अधिकारी, एक वर्ग-२ आणि एक वर्ग-३ अधिकारी या प्रकरणांमध्ये सामील आहेत.

या बेहिशेबी मालमत्ता प्रकरणांपैकी बहुतेक, म्हणजेच तीन, पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांविरुद्ध दाखल करण्यात आली आहेत, तर एक प्रकरण महानगरपालिका अधिकाऱ्याविरुद्ध आहे. एकूण ४.१७ कोटी रुपयांपैकी, ३.८२ कोटी रुपये पोलीस अधिकाऱ्यांशी संबंधित आहेत, तर ३५.१६ लाख रुपये महानगरपालिका अधिकाऱ्याशी संबंधित आहेत.

लाचखोरीच्या प्रकरणांबद्दल बोलायचे झाल्यास, महाराष्ट्र एसीबीने जानेवारी ते २९ जुलै दरम्यान ४१८ प्रकरणे दाखल केली आहेत. आकडेवारीनुसार, महसूल आणि भूमी अभिलेख विभागाच्या (११७) अधिकाऱ्यांविरुद्ध सर्वाधिक लाचखोरीचे खटले दाखल झाले आहेत, त्याखालोखाल पोलीस (६६) आणि पंचायत समिती (४२) यांचा क्रमांक लागतो. सविस्तर विश्लेषण असे दर्शवते की, लाचखोरीच्या प्रकरणात पकडलेले बहुतेक अधिकारी वर्ग-३ सरकारी कर्मचारी (२९२) आहेत, तर वर्ग-२ (७५), वर्ग-१ (४८) आणि वर्ग-४ (२२) अधिकारीही सामील आहेत. या भ्रष्टाचार प्रकरणांमध्ये गुंतलेली एकूण रक्कम १.५० कोटी रुपये आहे.

महाराष्ट्र एसीबीने नऊ भ्रष्टाचार-संबंधित प्रकरणांची माहिती राज्य सरकारकडे पाठवली आहे, ज्यात आरोपींच्या १६.८८ कोटी रुपयांच्या मालमत्ता गोठवण्याची परवानगी मागितली आहे. सर्वाधिक मालमत्ता शहरी विकास विभाग (३.१३ कोटी रुपये), जलसंपदा विभाग (२.८२ कोटी रुपये) आणि सार्वजनिक बांधकाम विभाग (२.४८ कोटी रुपये) यांच्याशी संबंधित अधिकाऱ्यांशी जोडलेली आहे.

मुंबई विभागात अशी सर्वाधिक प्रकरणे (४) आहेत, त्यानंतर पुणे (२) आणि नाशिक, छत्रपती संभाजी नगर आणि नांदेड विभागातून प्रत्येकी एक प्रकरण आहे, जिथे एसीबी मालमत्ता गोठवण्याची मागणी करत आहे.

# रा.स्व.संघाच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



पुणे - समरसता गतिविधी कात्रज व पर्वती भाग यांच्यावतीने आज शुक्रवार दि. १ ऑगस्टला बिबवेवाडी येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास १०५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. रा.स्व.संघाचे कात्रज भागाचे संघचालक शिवाजीराव मालेगावकर आणि समरसता गतिविधी प. महाराष्ट्र प्रांत कार्यकारिणी सदस्या डॉ. उज्वलाताई हातागळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच सामाजिक समरसता मंच येरवडा आणि वडगाव शेरी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अण्णाभाऊ साठे सभागृह( गुंजन सिनेमा) येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी सद्भाव, समरसता मंच येरवडा आणि वडगाव शेरी विभाग तसेच विश्रांत वाडी नगरातील संघ कार्यकर्ते उपस्थित होते.

# कृतीतून माणुसकी,एकजुटीचा मंत्र देणारा मार्गदर्शक हरपला - रतन शारदा

पुणे - दि. २ - आपले जीवन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यासाठी सुनीलराव खेडकर यांनी समर्पित केले. त्यांचे संघटन कौशल्य,संवाद कौशल्य आणि प्रत्येक कामाचा पाठपुरावा करण्याची त्यांची वृत्ती ही आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आपल्या कृतीतून माणुसकी आणि संघातून एकजुटीचा मंत्र देणारा मार्गदर्शक हरपला आहे पण त्यांचे समर्पण आपल्याला कार्याची प्रेरणा देते असे मत प्रसिद्ध लेखक डॉ. रतन शारदा यांनी व्यक्त केले.

पुणे महानगराचे माजी प्रचार प्रमुख आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक सुनीलराव खेडकर यांचे नुकतेच पुण्यात निधन झाले. कर्वेनगर येथील कमिन्स कॉलेजच्या सभागृहात आयोजित त्यांच्या श्रद्धांजली सभेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, संभाजी भाग संघचालक अनिल व्यास उपस्थित होते.

शारदा पुढे म्हणाले, सुनीलराव यांचे संघटन कौशल्य केवळ माणसांना एकत्र आणण्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते प्रत्येक व्यक्तीमधील सुप्त क्षमता ओळखून त्यांना योग्य न्याय देण्यासाठी धडपडणारे होते. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्ते घडले. समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान त्यांनी दिले. असेही ते म्हणाले. आपल्या पुस्तक निर्मितीत सुनीलराव यांचा मोलाचा वाटा असून 'संघ आणि स्वराज्य' हे पुस्तक त्यांनी यावेळी खेडकर यांना समर्पित करत त्यांच्या कुटुंबियांना दिले.

यावेळी पुणे महानगर चे संघचालक रवींद्र वंजारवाडकर म्हणाले की, सुनीलराव यांचे संवाद कौशल्य इतके प्रभावी



होते की, अगदी सामान्य माणसापासून ते मोठ्या पदावरील व्यक्तींपर्यंत सर्वांशी ते सहज संवाद साधू शकत होते. त्यांच्या बोलण्यातून फक्त शब्दच नाही, तर आपुलकी आणि आपलेपणा जाणवत असे. सर्व कामात बारीकसारीक निरीक्षणे, अभ्यास आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीचे नियोजन ते करत असत. पुण्यात विविध ठिकाणी बाल शाखा लागण्यात त्यांचा पुढाकार होता. त्यांच्या एका शब्दावर कोणताही कार्यकर्ता कामाला लागायचा, हे त्यांच्या संवाद कौशल्याचेच यश होते.कोणतेही काम हाती घेतल्यावर ते पूर्णत्वास नेण्याची त्यांची जिद्द वाखाणण्याजोगी होती. कामाचा पाठपुरावा करण्याची त्यांची सवय ही कामात यश मिळवण्याचे एक महत्त्वाचे कारण होते. त्यांच्या प्रत्येक कामात स्पष्टता आणि अचूकता दिसून येत असे. आज जरी ते आपल्यात नसले, तरी त्यांचे कार्य, त्यांचे विचार आणि त्यांनी घालून दिलेली मूल्यांची वाटचाल आपल्याला नेहमीच प्रेरणा देत राहील. असेही ते म्हणाले.

शिस्त, निष्ठा आणि समर्पण हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे तीन भक्कम आधारस्तंभ होते. स्थानिक तसेच प्रांत स्तरावर संघ कार्यामध्ये त्यांनी आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचे जीवन म्हणजेच सेवा, त्याग व कर्तव्यभावनेचे मूर्तिमंत उदाहरण होते. युवकांचा राष्ट्रनिर्मितीमध्ये सहभाग वाढवण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबवले.

कुटुंबातील सर्वांचा परिचय करून घेत प्रत्येकाला विविध पद्धतीने संघ कामात कसे आणता येईल यासाठी ते फक्त कार्यकर्ता नाही तर कुटुंबाशी जोडले गेले होते. संघ कामासोबतच आपल्या व्यवसायातील त्यांची शिस्त आणि सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांना त्यांनी 'मित्रा' संबोधून कायम जोडून ठेवले. त्यामुळे सुनीलराव सर्वांना आपले वाटले. असे मत त्यांच्या सोबत काम केलेल्या मित्र, व्यवसायिक, प्रचार विभागातील कार्यकर्ते, कौटुंबिक हितचिंतक यांनी व्यक्त केले.सत्यजित चितळे,सुहास देव, विराज देवडीकर,रुपाली भुसारी,सार्थक शिंदे आदिंनी यावेळी मनोगत व्यक्त केले. राजू चौथाई यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी खेडकर यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

## तुम्हाला माहिती आहे का?

- बुद्धीबळात ज्या चाली खेळल्या जातात त्यांची संख्या जगभरातील इलेक्ट्रॉन्सपेक्षा जास्त आहे. या खेळाचा उगम भारतात झाला असून, त्याचे मूळ नाव चतुरंगा आहे. भारतातून पर्शिया आणि अरब राष्ट्रांमध्ये प्रसार झाल्यावर या खेळाला चेक मेट असे नाव मिळाले. लेखी अभ्यासानुसार, बुद्धीबळाच्या एका खेळात जास्तीत जास्त ५,९४९ चाली खेळता येतात. वर्ष १९७० मध्ये सर्वप्रथम अंतराळात बुद्धीबळ खेळले गेले. २० जुलै हा जागतिक बुद्धीबख दिवस म्हणून साजरा केला जातो.

www.tarunbharat.net

रविवार, दि. ०३ ऑगस्ट २०२५

तरुण भारत छोटे उस्ताद



## अशी पाखरे येती

निशिकांत मायी / ९८८११५२४३९


# देखणा धोबी



महाराष्ट्रात सर्वत्र आढळून येणारा परीट अर्थात धोबी हा पक्षी साधारणपणे बुलबुल या पक्ष्याएवढा असेल. तो स्थलांतरित पक्षी असू त्याची लांबी २१ सेंटीमीटर असते. सतत वरखाली होणारी शेपटी हे त्याचं वैशिष्ट्य असून, त्याचमुळे त्याला परीट किंवा धोबी असे नाव पडले. त्याची वरील बाजू, डोके, गळा, छाती व शेपटी काळ्या रंगाची असते. मात्र, छातीकडील बाजू पांढरी असल्याचे आपल्या लक्षात येते. तसेच, भुवई सारखा डोळ्यांच्या वरा भागही पांढराच असतो. पंखांवरचे पांढरे पट्टे नजरेत भरतात. 'चीज्जॅट्' असा त्याचा काहीसा जोरकस आवाज आसमंतात घुमतो. मात्र, विणीच्या काळात मादी पक्ष्याचा तोच आवाज मधुर होऊन उल्हासित करतो. सोबतच शीळही घालतो. परीटांना शोधायचे झाल्यास नदी, तलाव,

**सतत वरखाली होणारी शेपटी हे त्याचं वैशिष्ट्य असून, त्याचमुळे त्याला परीट किंवा धोबी असे नाव पडले. त्याची वरील बाजू, डोके, गळा, छाती व शेपटी काळ्या रंगाची असते. मात्र, छातीकडील बाजू पांढरी असल्याचे आपल्या लक्षात येते.**

सरोवरे आणि पाटबंधाऱ्यानजीकच्या त्यांच्या अधिवासावर लक्ष ठेवावे लागेल. महाराष्ट्रातील विविध शहरे किंवा गावखेड्यांमधील जलाशयाजवळ हा पक्षी आपल्याला हमखास दिसून येतो. छोटे कीटक किंवा कोळी खाऊन परीट आपली भूक भागवतो. सर्वसामान्यपणे धोबी पक्ष्यांना माणसांच्या आसपास राहायला आवडते. बागेत आणि शेताजवळ तो दिसतो. कधी कधी जोडीने फिरणारा धोबी सदान्कदा किडे, चतुर, टोळ, नाकतोडे टिपत असतो. करडा आणि पिवळा अशा दोन रंगातही तो दिसतो. तशा तर धोबी किंवा परीट पक्ष्याच्या १२ उपप्रजाती आहेत. विणीच्या काळात ते नदीपात्रातील खडकावर किंवा भिंतींच्या आडोशाने मुळ्या, केस, लोकर, चिंध्या, सुतळी, दोरे, सुकलेलं शेवाळ, गवत आदींच्या साहाय्याने घरटे बांधतात. या घरट्यात पिसे, लोकर किंवा केसांची मऊ गादी तयार करून मादी एका वेळेस तीन ते आठ अंडी घालते. नर व मादी दोघे मिळून अंडी उबवण्याचे आणि पिलांना वाढवण्याचे काम करतात. दोनेक आठवड्यात पिलांची पूर्ण वाढ होऊन ती स्वतंत्रपणे जगण्यास सक्षम होतात.









दोस्तहो नमस्कार हा बुद्धीचा खुराक.. खास आपल्या सर्वांसाठी.


**हसतखेळत** रचनाः-सौ.सुरेखा विजय काणे ९९६००५३५२१




–:सुचना:–
या चौकोनात पाच अक्षरी इंग्रजी शब्द लिहा. आडव्या व उभ्या शब्दांचा समानार्थी अर्थ बाहेरच्या चौकोटीत लिहिला आहे. चौकोनातील अक्षरांपासून तीन अक्षरी शब्द बनवा.
किमानः-दहा कमालः-कितीही




–:सुचना:–
प्रत्येक आडव्या व उभ्या रांगेतील पदावलीचे उत्तर( 27 )आहे. त्यासाठी पांढऱ्या चौकोनात योग्य चिन्हांची निवड करा.




–:सुचना:–
या चौकोनात पाच अक्षरी मराठी शब्द लिहा. आडव्या व उभ्या शब्दांचा समानार्थी अर्थ बाहेरच्या चौकोटीत लिहिला आहे. चौकोनातील अक्षरांपासून तीन अक्षरी शब्द बनवा.
किमानः-दहा कमालः-कितीही

## देशोदेशीच्या लोककथा

प्रीती वडनेरकर/ ९८२३९९४७९२

# भोळा इव्हान

**भाग ५**

उझबेकिस्तानच्या चिमगान भागात बोरीस नावाचा जमीनदार रहात होता. त्याला मिखाईल, ॲलेक्सी आणि इव्हान असे तीन मुलगे होते. मिखाईल आणि ॲलेक्सी, व्यवहार चतुर, हुशार होते तर इव्हान जरासा बुद्धू, व्यवहार ज्ञानात कच्चा होता. तासन्तास गावालगतच्या जंगलात जाऊन बसणं हा त्याचा छंद होता. झाडं, वेली, पाखरं यांच्याशी गप्पा गोष्टी करण्यात त्याला विशेष रस होता.'अरे पीच वृक्षा, तुझ्या तळाशी, खूप वाळकी पाने, पाचोळा पडला आहे. तो कोण उचलणार? मीच उचलला असता पण, माझ्याकडे झाडू नाहीये नं?' इव्हान पीच वृक्षाशी बोलत राही. अचानक वारा येऊन, पालापाचोळा उधळून लावत असे.'अरे, अरे... माझं बोलणं इतकं मनावर घेऊ नकोस. मला तसं म्हणायचं नव्हतं. तू तर सगळा कचरा उडवून टाकलास.' दुसऱ्या दिवशी, स्वतःबरोबर झाडू, पाण्याची झारी घेऊन इव्हान पीच वृक्षाच्या पायथ्याची जागा, साफ करून तिथे पाणी शिंपडून निघून जात असे.

मिखाईल आणि ॲलेक्सी त्याची टर उडवीत. 'इव्हान, तू दिवसभर काय कामधंदा करतोस? किती पैसे मिळवतोस?''मी...जंगलात जातो, तिथे वृक्षांचा पाला पाचोळा, कचरा साफ करतो. जंगलातून जाणाऱ्या वाटसरूंसाठी जागा स्वच्छ करतो. म्हणजे त्यांना, झाडाखाली बसून विश्रांती घेता येते, न्याहारी करता येते.' 'अरे वा! त्याच्याबद्दल तुला किती पगार मिळतो? कोण पगार देतं?''अजून काही दिले नाहीत पैसे... पण कधीतरी देतील.' इव्हानच्या बोलण्यावर मिखाईल आणि ॲलेक्सी जोरजोरात हसत अन् त्याला चिडवत.

मिखाईल आणि ॲलेक्सी, दोघेही आपल्या वडिलांचा सारा कारभार उत्तम सांभाळत होते. बोरीस यांचं निधन झाल्यावर त्यांची संपत्ती दोघा भावांनी आपापसात वाटून घेतली आणि लोकलाजेस्तव इव्हानला एक गाय दिली. 'इव्हान, तू या गायीला चरायला घेऊन जात जा. तिच्या दुधावर जेवढे पैसे मिळतील त्यावर गुजराण करत जा. बाकी, आमच्या दोघांच्या घरी तुझं जेवणखाण आणि राहणं होत जाईल.' इव्हान भोळा होता. त्याला वडिलांच्या संपत्तीत मुळीच स्वारस्य नव्हतं. भावांनी सांगितल्याप्रमाणे, त्यांनी दिलेल्या गाईची तो व्यवस्थित काळजी घेत असे. तिला जंगलात घेऊन जात असे. झाडं, फुलं, वेली सगळ्यांशी गप्पा मारून संध्याकाळी घरी येत असे.

मिखाईल आणि ॲलेक्सीनं वडिलांचा कारभार चांगला वाढवला. एका हवेलीच्या चार हवेल्या झाल्या. पन्नास गाई, शेळ्या, मेंढ्या, दहा घोडे, त्यांचे गोठे, तबेले... दारात पाच सहा घोडागाड्या होत्या. यथावकाश त्यांची लग्न होऊन मुलंबाळंही झाली. इव्हान मात्र आपल्या गाईमधेच आनंदी होता. सारे गावकरी, इव्हानशी प्रेमानं वागत आणि बोलत.

'इव्हान बाबा, काय म्हणते तुमची गाय? तुमच्याशी बोलते नं?'

'जेवणखाण झालं नं?'

'आता लग्न कधी?'

इव्हानही न चिडता त्यांना योग्य उत्तरे देत असे. 'माझी गाय आणि तिचं वासरू, दोघंही छान आहेत. गाय भरपूर दूध देते आणि वासरू माझ्याशी खेळत राहते. माझी मस्त करमणूक होते. माझ्याबद्दल इतकी काळजी दाखवली, त्याबद्दल धन्यवाद.'

सारं सुरळीत चालू होतं आणि अचानक एका रात्री, जोराचं वादळ आलं. सर्व घरांवर ठेवलेले पत्रे उडाले. त्यातच मुसळधार पाऊस सुरू झाला, ढगफुटी झाली. बघता बघता, साऱ्या गावाला महापुराच्या पाण्यानं वेढलं. सारे गावकरी घराच्या छतांवर चढून बसले.

इव्हान आपल्या गाई आणि वासराला घेऊन, गावच्या टेकडीवर जाऊन बसला. पीच वृक्षाच्या खाली आसऱ्याला थांबला. क्रीक क्रीक क्रीक... पीचच्या



फांद्यांमधून आवाज येऊ लागला.

'काय म्हणायचंय तुला? वादळामुळे, तुझ्या फांद्यासुद्धा कमकुवत झाल्यात? तुटायला आल्यात?' इव्हाननं झाडाला विचारलं. क्रीक क्रीक...झाडाच्या फांद्या बोलल्या. इव्हाननं इकडे तिकडे शोधलं. मोठ्या वृक्षांच्या पारंब्या बाजूला पडल्या होत्या. इव्हाननं त्या गोळा केल्या. त्याचा दोरीसारखा उपयोग करून, पीचच्या कमकुवत फांद्या ज्या तुटायला आल्या होत्या, त्यांना बांधून टाकलं. ज्या फांद्यांनी, पानांनी माना टाकल्या होत्या, त्या परत टवटवीत दिसू लागल्या. त्यांच्यात जीव आला, चैतन्य आलं.

इव्हाननं वृक्षाच्या बुंध्याला थोपटलं. आपल्या गाईला आणि तिच्या वासराला चारा शोधून, खायला दिला. स्वतः पावसामुळे खाली पडलेली फळं खाल्ली.

वादळाचा आणि पावसाचा जोर हळूहळू कमी झाला. पुराचं पाणीसुद्धा ओसरलं.

इव्हान टेकडीवरून गाईला घेऊन खाली उतरला. संपूर्ण गाव उध्वस्त झालं होतं. त्याच्या भावांच्या चारही हवेल्या, जमीनदोस्त झाल्या होत्या. गोठ्यामधल्या गाई, तबेल्यामधले घोडे, शेळ्या, मेंढ्या सारे पुरात वाहून गेले होते.

ॲलेक्सी आणि मिखाईल दोघं, डोक्याला हात लावून बसले होते. इव्हानला पाहून त्यांना रडूच कोसळलं. इव्हाननं त्यांना धीर दिला. घराच्या भिंती, घरावरचे पत्रे सारं बांधून, घर ठाकठीक केलं. गावातल्या पडलेल्या झाडांच्या तुटलेल्या फांद्यांची, लाकडं, चुलीत घातली, चूल पेटवली. मिखाईल आणि ॲलेक्सीच्या बायकांनी, पेटलेल्या चुलीवर स्वयंपाक केला. इव्हाननं गावातून फेरफटका मारला. सर्वांचीच घरं तुटली होती. इव्हाननं साऱ्या गावाचा मक्ता घेऊन, साऱ्यांची घरं दुरूस्त केली, ठाकठीक केली. प्रत्येक घरात चूल पेटली. प्रत्येकाच्या पोटात दोन घास गेले. आपल्या गाईचं कप कप दूध, प्रत्येक घरात वाटलं.

साऱ्यांनी इव्हानला, आशिर्वाद दिला. पाणी ओसरल्यावर सारं गाव हळूहळू पूर्वस्थितीत येऊ लागलं. सगळं स्थिस्थावर होऊ लागलं. मिखाईल आणि ॲलेक्सीचं खूप नुकसान झालं होतं. गुरं ढोरं, सोनं नाणं, अन्न धान्य सारं वाहून गेलं होतं. आता पुढे काय हा यक्ष प्रश्न उभा होता. परत इव्हान पुढे आला. शेतीत साचलेला गाळ त्यानं उपसून ठेवला. जंगलात जाऊन मिळेल ते बियाणं वेचलं, पेरलं. पण, त्याला उगवायला बराच काळ जाणार होता.

'मिखाईल, ॲलेक्सी, मला वाटतं, तुम्ही शेजारच्या गावात जाऊन फेरफटका मारून यावं. त्यांच्या भागात पाऊस पडला नसेल तर आपल्याला ते अन्नधान्य विकत देतील. आपण आपली पेरलेली पिकं गहाण ठेऊ.' दोघा भावांना इव्हानच्या बोलणत तथ्य वाटलं. ते शेजारच्या गावात गेले. साऱ्या गावाला पुरेल एवढं धान्य त्यांनी आणलं. अचानक इव्हानची गाय पळू लागली. शिंगं रोखून पळू लागली. इव्हानही तिच्या मागे धावला. बऱ्याच वेळानंतर एका चोरट्याला घेऊन आला.

'हा भामटा, आपण आणलेलं धान्य चोरून पळत होता. माझ्या गाईनं त्याला पाहिलं. ती शिंगं रोखून त्याला मारायला निघाली होती. मी मारू दिलं नाही. त्याला पकडून घेऊन आलो. त्याला काय शिक्षा द्यायची?'इव्हाननं विचारलं. 'सगळ्या गावच्या शेतीतल्या पिकांची काळजी घ्यायची. साफसफाई करायची कबूल?' मिखाईलनं विचारलं.

चोरानं मिखाईलचे पाय पकडले. क्षमा मागितली. 'सध्या, आपल्या भावांना गावात पैशांची फार गरज आहे. आपण काहीतरी केलं पाहिजे. काय करावं? हं, ही आपली गाय विकायला हवी. खरं तर या विचारानं सुद्धा दुःखं होतंय, पण त्याशिवाय दुसरा इलाज नाही,' इव्हाननं विचार केला.

गाय आणि वासरू घेऊन तो जंगलात गेला. आपल्या आवडत्या पीच वृक्षाखाली बसला.

'काय करू मी? माझी गाय कोण घेणार?'

क्रीक क्रीक क्रीक...

'किती पैसे देशील? हे बघ शंभर रूबल्सपेक्षा एक दमडा कमी नाही चालणार. केव्हा देशील पैसे? उद्या? ठीक आहे! मी गायीला आणि वासराला तुझ्या बुंध्याला बांधून ठेवतो,' इव्हान म्हणाला आणि गाय-वासराला बांधून निघून गेला.

'इव्हान गाय कुठे आहे?' भावांनी विचारलं.'जंगलातल्या पीच वृक्षाला विकून आलो.' इव्हाननं उत्तर दिलं. दोघं भाऊ खो खो हसायला लागले. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे इव्हान जंगलात गेला. गाय वासरू तिथेच होते.

'माझे पैसे?' त्यानं वृक्षाला विचारलं.

क्रीक क्रीक...

'काय तुझ्याकडे पैसे नाहीयेत? मला हे चालणार नाही.' इव्हाननं वृक्षाच्या एका मोठ्या फांदीवर घाव घातला. अचानक एक मोठा बटवा खाली पडला. त्यात वीस हजार रूबल्स होते. इव्हाननं झाडाला धन्यवाद दिले. तो धावत निघाला. क्रीक क्रीक क्रीक... झाडानं हाक मारली.

'काय? गाय आणि वासरालाही घेऊन जाऊ?' इव्हाननं पैशाची थैली अन् गाय-वासरू साऱ्यांना बरोबर घेतलं. तो घरी पोहचला. त्याचा सौदा पाहून भावांचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली. घर, शेती साऱ्यांची दुरूस्ती होऊन हवेल्या पुन्हा उभ्या राहिल्या. आता साऱ्याचा मालक इव्हान झाला होता.

## वारसा

प्रवीण अविनाश योगी/+९१ ७५०७४ ९३११२

# बुलंद किल्ला पन्हाळा

**१०**

नोव्हेंबर १७५९ रोजी प्रतापगडाच्या पायथ्याशी छत्रपती शिवरायांनी अफजलखानाचा वध आणि त्याच्या सोबतच्या सेनासागराचा, आपल्या नियोजन कौशल्याने प्रचंड पराभव केला. अफजलखानाचा वध हे म्हणजे काळ-काम-वेगाचे गणित होते. अवघ्या एक-दीड दिवसात ही कामगिरी आटोपली. या अकल्पित घटनेतून आदिलशाही पूर्ण सावरण्याआधीच चंदन, वंदन, वैराट, वसंतगड आदी ठाणी जिंकून कराड, कोल्हापूर गाठून दुसरा तडाखा दिला. दक्षिण महाराष्ट्रातील बुलंद किल्ला पन्हाळगडही जिंकला. हा तडाखा इतका जबरदस्त होता की, अवघ्या १८ दिवसात वाई ते कोल्हापूर हा संपूर्ण भाग स्वराज्यात आला होता.

ब्रह्मगिरी, पन्नगालय, पनाला, पन्हाळा-शहानबीदुर्ग अशा अनेक नावांनी हे ठिकाण ओळखले जात होते. या किल्ल्याची उभारणी बहुदा भोजराजा या शिलाहारवंशीय राजाने केली असावी. सिद्धी जोहरचा वेढा, त्यातून नाट्यमयरीतीने शिवरायांची झालेली सुटका, शिवा काशीद व बाजीप्रभू देशपांडे यांचे बलिदान, हेन्री रेविंगटनचा पन्हाळ्याच्या वेढ्यातील आपमतलबीपणा व पुढे शिवरायांनी त्याचा काढलेला वचपा, मोगली फौजेसह पन्हाळ्याचा ताबा घेताना झालेला शिवाजी महाराजांचा पराभव (१६ जानेवारी १६६६) आणि त्यांचा नेताजी पालकराशी उडालेला खटका, ६ मार्चच्या रात्री कोंडाजी फर्जंदने केलेला अवघ्या साठ माणसांसह हा किल्ला ताब्यात घेण्याचा अद्वितीय पराक्रम, अशा अनेक गोष्टी पन्हाळगडाशी निगडित आहेत. या सर्वच घटना अत्यंत रोमांचकारी आहेत. सध्या पन्हाळा हे तालुक्याचे ठिकाण आहे. स्वतंत्र नगरपालिका आहे. गडावर डांबरी रस्ते असल्याने गड पाहणं सोपं झालं आहे. तीन दरवाजा-चार दरवाजा-वाघ दरवाजा, राजदिंडी अशा वाटा, कविवर्य मोरोपंत यांचे स्मारक, महालक्ष्मी मंदिर, ताराबाईंचा राजवाडा, जवळचे शिवछत्रपती मंदिर, सज्जाकोठी, तबकबन, कलावंतिणीचा सज्जा तसेच दुतोंडी बुरुज, दौलती बुरुज, काली बुरुज, पुसाटी बुरूज, गंगा सिंधू सरस्वती या धान्यकोठ्या, अंधारबाव, गडाला पाणी पुरवठा करणारे सदोबाचे तळे, सोनाळे तळे, सोमेश्वर तलाव, संभाजी देवालय, जिजाबाई महाराणींचे देवालय, पराशर ऋषींची गुहा अशा अनेक गोष्टी गडावर पाहण्यासारख्या आहेत.

पन्हाळा किल्ल्याशेजारीच पावनगड-मसाईचे पठार व तेथील देवीचे मंदिर, ज्योतीबाचा डोंगर, पोहाळ्याची लेणी अशा कितीतरी गोष्टी या परिसरात आहेत. पन्हाळ्याचा एकूण परिसर हिरव्यागार वनश्रीने नटलेला असून हवा अतिशय अल्हाददायक असते.



# तुळस लावा, पर्यावरण वाचवा!

(पान १ वरून)

ही तुळस एकटी तर उपयोगी आहेच पण, इतर औषधांना सोबत करून त्यांचे औषधी गुणधर्म शतपटीने वाढवण्याचे मोलाचे काम ही करते. पूर्वी औषध दीर्घकाळ टिकवण्यासाठी तुळशीच्या काढ्याच्या सहाय्याने औषध तयार करण्याची पद्धत होती, आजही आहे. याचे कारण म्हणजे जंतूंपासून इतरांचे रक्षण करणे हा तिचा स्थायीभाव आहे. तुळशीच्या औषधी गुणधर्माबाबत अनेक आधुनिक संशोधनेही झाली आणि सतत होतही आहेत. संशोधनांद्वारे हे सिद्ध झाले की, तुळशीच्या सेवनाने मानसिक तणाव, चिंता, मानसिक थकवा व झोपेविषयीच्या समस्या दूर होण्यास मदत होते. तुळशीमुळे हृदयाचे संरक्षण होते. रक्तातील साखरेची व चरबीची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

तुळशीच्या सेवनाने शरीराची प्रतिकार क्षमता वाढविण्यात मदत होते. त्यायोगे शरीराचे वेगवेगळ्या संक्रमणापासून संरक्षण होते. तुळशीत अँटिऑक्सिडंट गुणधर्म आढळले आहे. कर्करोगाच्या उपचारादरम्यान रुग्णाची प्रतिकार क्षमता वाढविण्यात तुळशीच्या सेवनाने मदत होते. आबालवृद्धांना सदा सर्वकाळ उपयोगी पडणारी, अगदी जन्मापासून अंतापर्यंत आपल्याला सोबत करणारी बहुगुणी तुळस! ही दारासमोर राहून घराचं सौंदर्य वाढविते. सदा बहरलेली असल्याने मनाचे सौंदर्य वाढविते. त्वचेच्या संपर्कात आली तर चेहऱ्याचं सौंदर्य वाढविते. औषधरुपाने शरीरात गेली तर अवयवांना सुदृढ करून देहाचं सौंदर्य वाढविते. कुणाला भेट म्हणून दिली तर नात्यातलं सौंदर्य वाढविते. तिला दान केली तर पुण्यसंचय करून आयुष्याचा सौंदर्य वाढवते व तिची नियमित पूजा केली तर पापक्षालन करून आत्म्याचं सौंदर्य वाढविते. अशी ही तुळस उत्तरोत्तर आपणास सर्वांगसुंदर करो, अशी कृष्णचरणी प्रार्थना!

# मुंबईचे ज्येष्ठ गायक पंडित राजा काळे यांचा सुरेल जलवा

कन्नड :- दि.०२ ऑगस्ट - भारतीय शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीतातील मानाचे नाव असलेले, पन्नास वर्षांचा सुवर्ण प्रवास पूर्ण केलेले मुंबईचे ज्येष्ठ गायक पंडित राजा काळे आज कन्नड शहरात आपल्या सुरेल अभंगांनी रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या गौरवशाली गानपरंपरेचा वारसा जपणारे राजा काळे संगीताची गोडी नवीन पिढीला लागावी यासाठी ते स्वरभिषेक प्रतिष्ठान तर्फे देशभरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. आज, ३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता डोणगाव येथील पांडुरंग वारकरी शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना शास्त्रीय संगीताचे धडे देऊन प्रेरणा देणार आहेत. यानंतर सायंकाळी ४ ते ६ दरम्यान माळीवाडा येथील हनुमान मंदिरात सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात त्यांच्या अभंगवाणी कार्यक्रमाने रसिकांची मनं जिंकणार आहेत. आजच्या अभंगवाणी कार्यक्रमात - ते रुप पाहता लोचनी, बोलावा विठ्ठल, करावा विठ्ठल, आम्ही विठ्ठलाचे वारकरी, ते माझे सोयरे सज्जन सांगाती, सुंदर ते ध्यान उभे विटेवरी असे एकापेक्षा एक सरस अभंग रसिकांना ऐकायला मिळणार आहेत. 'अभंगवर्षा' या नावाने दरवर्षी देशभरात सादर होणाऱ्या त्यांच्या कार्यक्रमाची सुरुवात पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते झाली होती, हे विशेष. माळीवाडा सप्ताह समिती व माळी समाज पंच समितीने कन्नड व पंचक्रोशीतील सर्व रसिकांना या अद्वितीय कार्यक्रमाचा आनंद घेण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.



## दलित पँथर चा आज राज्यव्यापी प्रबोधन मेळावा

छत्रपती संभाजीनगर : रविवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी डॉ. अबुल कलाम आझाद हॉल कोरेगाव पार्क पुणे येथे भारतीय दलित पँथर महाराष्ट्र यांचा दुसरा वर्धापन दिन व राज्यव्यापी प्रबोधन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्या चे उद्घाटन वसंत मगन पातारे, अंबादास सैदू शिंदे यांच्या हस्ते होणार असून जयदेव गायकवाड , सयाजी वाघमारे, टेक्सास गायकवाड, झेडपी जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. या कार्यक्रमाचे संयोजक कपिल नरवाडे, प्राध्यापक भंडारे, साहेबराव बनसोडे, अनिल कांबळे, पप्पू कांबळे, सुभाष सरपाते, विनोद खुरगळे, संतोष कांबळे, राजाभाऊ सरनोबत हे आहेत. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय दलित पँथर महाराष्ट्र राज्य संघटनेचे मराठवाडा राज्य सचिव श्यामराव सावळे, कार्याध्यक्ष इंजि. नागसेन ढगे यांनी केले आहे.

## लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी



पैठण दि ०२ :- पैठण काला पहाड भागातील ब्राम्हण सभेच्या सभागृहात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करून अभिवादन करण्यात आले.

यាप्रसंगी अखिल भारतीय पेशवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष योगेश धर्माधिकारी,बाळासाहेब कस्तुरे, यशवंतराव खिस्ती,महेश जोशी,अरविंद तांगडे, सचिन कावसणकर,देशपांडे सर,प्रकाश वानोळे,उपयेंद्र मुधलवाडकर,संतोष जोशी, अभिषेक जोशी,अशोक कुलकर्णी, ओंकार उमरीकर,मंदार उज्जैनकर,प्रकाश शेवतेकर,संतोष टाक, विनोद लोहिया,संग्राम वानोळे आदींची उपस्थिती होती.

# महसूल सप्ताहात कन्नड तहसील कार्यालयात १७ प्रमाणपत्रांचे वाटप

## कन्नड तहसील कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महा-राजस्व अभियानांतर्गत प्रमाणपत्र वाटप

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०२ ऑगस्ट - महसूल सप्ताहानिमित्त कन्नड तहसील कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महा-राजस्व अभियानांतर्गत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार विद्याचरण कडवकर होते, या प्रसंगी विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र - ६, रहिवासी प्रमाणपत्र - ७, जातीचे प्रमाणपत्र - १, तर पुरवठा विभागाचे राशन कार्ड प्रमाणपत्र - ३ असे एकूण १७ प्रमाणपत्रे लाभार्थ्यांना देण्यात आली.



या कार्यक्रमास मंडळातील खातेदार, नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे.मंडळ अधिकारी आर. आर. चव्हाण , सुरवसे, महसूल अधिकारी बाळू घटे, दीपक एरंडे, डी. एस. शिंदे, विनायक कंचार, अप्पा घोलप, सुनील राठोड, कुशोड तसेच अन्य अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

अभियानाचे उद्दिष्ट


छत्रपती शिवाजी महाराज महा-राजस्व अभियानाचा उद्देश नागरिकांना महसूल संबंधित सेवा जलद, पारदर्शक आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देणे हा आहे. यामध्ये उत्पन्न, जात, रहिवासी, व राशन कार्ड प्रमाणपत्रांसारखी महत्त्वाची कागदपत्रे थेट नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांचा वेळ आणि खर्च वाचवणे हे अभियानाचे मुख्य ध्येय आहे.

नागरिकांना होणारे फायदे

या उपक्रमामुळे नागरिकांना विविध शासकीय प्रमाणपत्रांसाठी कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागत नाहीत. एकाच ठिकाणी व ठराविक वेळेत सर्व सुविधा उपलब्ध झाल्याने ग्रामीण भागातील लोकांचा गैरसोयीचा प्रश्न सुटतो. तसेच शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे वेळेवर मिळाल्याने शेतकरी, विद्यार्थी आणि इतर घटकांचे काम जलदगतीने पूर्ण होऊ शकते.

## मैत्रीमध्ये कोणतीही अपेक्षा नसते, फक्त निस्वार्थ प्रेम असतं : रचना पहाडे जैन

छत्रपती सभाजीगर : लोकांची नेहमीच अशी इच्छा असते की त्यांची मैत्री आयुष्यभर टिकावी, आयुष्यात असा क्षण कधीही येऊ नये ज्यामुळे आपली मैत्री कमजोर होईल. मैत्रीमध्ये, मित्रासाठी नेहमीच उज्वल भविष्याची इच्छा असते. मैत्री म्हणजे ती खजिना जिथून माणसाला कोणत्याही प्रकारच्या चांगल्या वस्तू मिळू शकतात.खरा मित्र मित्राच्या दु: खात दु: खी असतो आणि आनंदात आनंदी असतो. खरा मित्र त्याच्या मित्राच्या दु:खामध्ये नेहमीच त्याचे दु:ख विसरतो. खरा मित्र त्याच्या मैत्रीच्या मार्गावर कोणत्याही प्रकारची जातिव्यवस्था येऊ देत नाही.मैत्री कोणत्याही अवस्थेत असू शकते, उदा. मुलाला मुलाबरोबर रहाणे आणि मैत्री करणे आवडते, तरुण तरुणांसोबत खुश असतात तर वृद्ध माणसं आपल्या वयाच्या लोकांसोबत



मैत्री करण्यास प्राधान्य देतात. थोडक्यात असे म्हटले जाऊ शकते की एक मित्र म्हणजे तो सहचर असतो ज्याला आपण आपल्या सर्व रहस्ये, त्रास आणि सुखांसाठी साथीदार बनवितो. अनेकदा आपल्याहून भिन्न प्रवृत्ती आणि सवयी असणारे लोकं देखील आपल्या आकर्षित करता. मैत्री माणसाला एक चांगला मित्र होण्यासाठी, चांगले निष्ठावंत मित्र बनविण्यात आणि आपली मैत्री मजबूत ठेवण्यास मदत करते.

मैत्रीचे महत्त्व: मैत्री करणे खूप महत्वाचे आहे. जेव्हा जेव्हा एखादी व्यक्ती स्वत: ला दुसर्या व्यक्तीसोबत परिपूर्ण मानते, त्याच्याबरोबर असलेल्या त्रासांना स्वत: चे समजते तेव्हा त्याच्याबरोबर त्याचे दु:ख वाटू शकते. जरी रक्ताचे नाते, जातीय संबंध नसले तरीही तरीही ते भावनिकरित्या त्याशी जोडलेले आहेत, हा मैत्रीचा अर्थ आहे.

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल बिडकीन येथे अण्णाभाऊ साठे जयंती



तभा वृत्तसेवा बिडकीन दि.१ ऑगस्ट पैठण तालुक्यातील बिडकीन येथील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे आज दि १ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेतील काही शिक्षकांनी अण्णाभाऊ साठे हे समता, न्याय आणि मानवतेचे पुरस्कर्ते होते.त्यांनी समाजातील गरीब आणि वंचित घटकांसाठी आवाज उठवला. अण्णाभाऊ भारतातील एक समाजसुधारक , लोककवी आणि लेखक होते.अण्णाभाऊंनी आपल्या गायन कलेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा रशिया पर्यंत पोहोचला. याविषयी माहिती सांगितली व त्यांची लोकप्रिय असलेली छक्कड माझी मैना गावाकडे राहिली सादर केली.यावेळी शाळेतील शिक्षकवृंद दर्शना कोकणे, सुनिता चव्हाण, दिक्षा साबळे, शितल कुमावत, नितीन मोरे सर, वैष्णवी टकेकर व सीमा वंजारे या सर्वांची उपस्थिती होती.

## शामसुंदर महाराज सोन्नर यांना क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार



बीड (प्रतिनिधी) : सुप्रसिद्ध कीर्तनकार, जेष्ठ पत्रकार तथा संवेदनशील कवी ह. भ. प. श शामसुंदर महाराज सोन्नर यांना क्रांतिसिंह नाना पाटील आध्यात्मिक पुरस्कार जाहीर झाला असून या पुरस्काराचे वितरण रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार आहे, अशी माहिती क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठानचे वतीने मोहन गुंड यांनी दिली. क्रांतीसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठानच्या वतीने दिले जाणारे पुरस्कार जाहीर झाले आहेत. अध्यात्मिक कार्यासाठी दिला जाणारा प्रबोधन पुरस्कार यावर्षी शामसुंदर महाराज सोन्नर यांना जाहीर झाला आहे. शामसुंदर महाराज कीर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नावर भाष्य करतात. शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत करणे स्त्री भ्रूणहत्ये विरोधात जागृती करणे, कैद्याचे समुपदेशन करणे असे प्रबोधनात्मक उपक्रम शामसुंदर महाराज राबवित असतात. सध्या ते कीर्तनातून संविधानाचा जागर करीत आहेत. जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यात त्यांची संविधान दिंडी असते. त्यांच्या या प्रबोधनकार्याची दखल घेऊन त्यांना क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार जाहीर झाला आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- २३०/२०२५.

अर्जदारः १) संगिता राजेश चव्हाण वयः २९ वर्षे, धंदाः शेती. २) विजय राजेश चव्हाण वय २१ वर्षे, धंदाः शिक्षण ३) नंदिनी पिता राजेश चव्हाण वयः १७ वर्षे, धंदा शिक्षण अ.पाक अर्जदार नं ४) अंजली पिता राजेश चव्हाण वयः १५ वर्षे, धदाः शिक्षण अ.पा.क. अर्जदार नं.१. ५) पृथ्वीराज राजेश चव्हाण, वयः १३ वर्षे, धंदा शिक्षण अ.पा.क. अर्जदार नं.१. वरील सर्व अर्जदार रा. वरखेडी (बु) ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

// विरुध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. नामे. राजेश सोना चव्हाण हे दिनांक ०७/०५/२०२५ ला मौजे वरखेडी (५) ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती सभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः २५/९/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१/०७/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: १३७/२०२५.

अर्जदारः १) मनिषा राजेंद्र इंगळे (पाटील), ययः ४८ वर्षे, धंदा शेती, २) धीरज राजेंद्र पाटील ययः २८ वर्षे, धंदा शेती, वरील रा. शिंदोळ ता. सोयगांव जि. औरंगाबाद. ३) संजना विजय पाटील ययः २६ वर्षे, धंदा शेती, रा. चुंचाळे, ता. पाचोरा जि. जळगांव

// विरुध्द //

गैरअर्जदारः निरक

अर्जः वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे राजेंद्र भागवान पाटील हे दिनांक ०६/०२/२०२५ ला गौजे शिंदोळ ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असून त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक : ०७/०८/२०२५).

तरी. ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा, अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दिनांक : ३१/७/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- १४४/२०२५,

अर्जदारः १) सुनिल नंदलाल वाघ वयः ५६ वर्षे, धंदाः शेती. २) जागृत्ती सुनील वाघ, वयः २६ वर्षे, धंदाः शिक्षण. ३) शुभांगी सुनील वाघ, वयः २४ वर्षे, धंदाः शिक्षण. ४) बबीता सुनील वाघ, वयः २२ वर्षे, धंदा शिक्षण, वरील सर्व अर्जदार रा. वाडी सुतांडा ता सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). ५) छाया नंदलाल पाटील, वयः २८ वर्षे, धंदाः शेती, रा. लोन पिराचे ता. भडगांव जि. जळगांव.

// विरुध्द //

गैरअर्जदारः निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे कै. लक्ष्मीबाई सुनिल वाघ दिनाकः २३/०६/२००५ ला मौजे वाडी सुतांडा ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः ११/८/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१/७/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. एस. आर. तापडीया मॅडम, सहदिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात,**

दि.कि. अर्ज क्र. ३७३/२०२५

पुढील तारीख ०३/०९/२०२५

अर्जदार १- शौकत पि. अजीज पटेल, वय- ४६ वर्षे, धंदा- मजुरी. रा. शेलगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद २- मंजुर पि. अजीज पटेल, वय ४४ वर्षे, धंदा- मजुरी, रा. शेलगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३- इद्रीस पि. अजीज पटेल. वय ४३ वर्षे, धंदा- मजुरी. रा. शेलगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद४ महेबुब पि. अजीज पटेल, वय- ४२ वर्षे, धंदा- मजुरी. रा. शेलगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद ५- मरीयम बी भ्र. अजीज पटेल, वय ७४ वर्षे, धंदा मजुरी, रा. शेलगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैर अर्जदार :-निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु. ए. वारे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की. अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र. ५ ही त्यांची आई आहे. मयत अजीज मन्नु पटेल हे अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील होते व अर्जदार क्र. ५ चे पती होते व ते मुळ शेलगाव ता. कन्नडचे रहीवाशी होत४ अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र. ५ यांचे पती नामे अजीज मन्नु पटेल हे होते ते दिनांक ११/१०/२०२४ रोजी मौजे शेलगाव ता. कन्नड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ ते ४ यांचे आजी व आजोबा अर्जदार क्र. ५ यांचे सासु व सासरे हे पुर्वीच मयत झालेले आहे. अर्जदार यांना अजीज मन्नु पटेल यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी तसेच महसुल दप्तरी वारसांची नोंद करण्यासाठी तसेच तहसिल, ग्राम पंचायत कार्यालय येथे मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी तसेच शासकिय व निमशासकिय योजनेचा लाभ घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे दिनांक १७/०७/२०२५ रोजी तोंडी सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयताचे कायदेशीर वारस असुन अर्जदार क्र. १ ते ५ शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास. अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक ३१/०७/२०२५

आदेशावरून

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क स्तर कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि.अर्ज क ५२२/२०२५

अर्जदार : १) शिला रावसाहेब प्रधान, वय. ४२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. अंबेलोहळ ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर २) परशुराम रावसाहेब प्रधान, वय. २४ वर्षे, धंदा. निरंक, रा. अंबेलोहळ ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ३) प्रमोद रावसाहेब प्रधान, वय. २२ वर्षे, धंदा. शिक्षण, रा. अंबेलोहळ ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : निंरक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. ए. एस. इंगळे यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, रावसाहेब कारभारी प्रधान हे अंबेलोहळ ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. १४/०४/२०२४ रोजी अंबेलोहळ ता. गंगापुर येथे मयत झाले मयतास अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मुले आहे. या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत रावसाहेब कारभारी प्रधान यांना अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस असून अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय व इतर कार्यालयात अर्जदार हे मयत रावसाहेब कारभारी प्रधान यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्कयानिशी दिले आहे.

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि कि अर्ज क्र. ३७०/२०२५

पुढील तारीख ०४/०९/२०२५

अर्जदार : १) विशाल रविंद्र मगरे, वय २४ वर्षे, धंदा शिक्षण, रा. प्रगती कॉलनी, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद २) हिमांशु रविंद्र मगरे, वय २४ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. प्रगती कॉलनी, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) कमलाबाई पंडित मगर, वय ७१ वर्षे, धंदा घरकाम, रा. १८ भिम वैभव हाऊसिंग, सोसायटी धुळे, ता. जि. धुळे

विरुध्द

गर अर्जदार : निरंक

अज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअथी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु. ए. वारे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहीवाशी असून अर्जदार क्र. १ व २ हे आपसात सख्खे भाऊ आहे तसेच अर्जदार क्र. ३ ही त्यांची आजी आहे. अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील व अर्जदार क्र. ३ यांचा मुलगा नामे रविंद्र पंडित मगरे हे होते ते दिनांक १९/१०/२०२१ रोजी मौजे प्रगती कॉलनी कन्नड ता. कन्नड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ व २ यांची आई व अर्जदार क्र. ३ यांची सुन नामे सविता रविंद्र मगरे या होत्या त्या देखील दिनांक ०३/०८/२०२० रोजी मयत झालेल्या आहे तसेच अर्जदार क्र. १ व २ यांचे आजोबा व अर्जदार क्र. ३ यांची पती नामे पंडित श्रावण मगर हे होते ते देखील दिनांक ११/०४/२०२१ रोजी मयत झालेले आहे. सोबत मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. अर्जदार यांना रविंद्र पंडित मगरे यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठो वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच तहसिल, नगर पालोका कार्यालयात मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी तसेच शाकिय, व निमशासकिय योजनेचा लाभ घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे दिनांक २०/०७/२०२५ रोजी तोंडी सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे कायदेशीर वारस असुन अर्जदार क्र. १ ते ३ शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही.

त्याअथीं या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक ३१/०७/२०२५

आदेशावरून

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क स्तर कन्नड

### जाहीर प्रगटन

जावक क्रमांक २०२५ संकीर्ण सी आर नंबर २२९ कावी

अर्जदार : रसूल गफूर शहा घारेगाव (एकतुनी) तालुका जिल्हा छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार : ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय घारेगाव एकतुनी ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्ममृत्यू अधिनियम १९६९ सुधारित अधिनियम २०२३ चे कलम १३ (३)अनुसार अन्वे अर्ज

संदर्भ : श्री रसूल गफूर शहा घारेगाव एकतूनी घारेगाव ता. जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दिनांक १४/०७/२०२५ विषय करिता प्रकरणे अर्जदार यांनी एडवोकेट यांच्यामार्फत न्यायालयाच्या जन्ममृत्यू अधिनियम १९६९ च्या सुधारित अधिनियम २०२३ च्या कलम १३ ( ३) अन्वयानुसार यांची मुलगी नामे जरीना रसूल शहा यांचा दिनांक १६ /३ /१९९६ रोजी राहते घरी मौजे घारेगाव एकतुनी ता.जी. छत्रपती संभाजी नगर येथे जन्म झाला असून जन्म नोंद वहीत नोंद घेण्यासाठी न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केला आहे. अर्जदार यांची मुलगी नामे जरीना रसूल शहा यांची जन्म नोंद नसल्याबाबत ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय घारेगाव एकतुनी ता.जी छत्रपती संभाजी नगर यांचा दाखला सादर केलेला आहे सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअजदार व जनतेस सूचित करण्यात येते की अर्जदाराची मुलगी नामे जरीना रसूल शहा यांचा जन्म दिनांक १६/ ३/ १९९६ रोजी राहते घरी मौजे घारेगाव एकतुनी तालुका जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे झाला असून अर्जदार यांची मुलगी चे जन्म प्रमाणपत्र जारी करण्यास जर कोणाचा काही उजर आक्षेप हरकत तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आपला जर आक्षेप किंवा हरकत तक्रार मूळ कागदपत्रासह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय आलमगीर कॉलनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर छत्रपती संभाजीनगर येथे नाव संपूर्ण, पत्ता, संपर्क क्रमांक, स्पष्ट नमूद करून लेखी स्वरूपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला ओझर आक्षेप हरकत तक्रार ग्राही धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे जन्म प्रमाणपत्र साठी चा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहीर प्रगटन माझ्यासहि शिक्यानिशी दिनांक २८/ ०७/ २०२५ रोजी देण्यात आले.

दिनांक : २८/०७/२०२५

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर

उपविभागीय अधिकारी

छत्रपती संभाजी नगर

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. वि.द. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश, क. स्तर कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. ३८४/२०२५

पुढील ता. ३०/०९/२०२५

अर्जदार : सलिमखाँ पिता अब्दूलखॉ पठाण, रा. कनकावती नगर, कारखाना परिसर, कन्नड, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण: कायदेशीर वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, अर्जदार यांचे वकील ॲड. कृष्णा जाधव यांचे मार्फत या न्यायालयात मयत श्री. महमंदखों पिता अब्दुलखॉ पठाण, रा. कनकावतीनगर, कारखाना परिसर, कन्नड, ता. कन्नड हे दिनांक-२६/०३/२००७ रोजी मौजे कनकावतीनगर, कन्नड येथे मरण पावले असून त्यांची पत्नी नामे श्रीमती आबेदाबी भ्र. महमंदखॉ पठाण हि दि. १७/०१/२०१५ रोजी मरण पावलो असून उभय पती-पत्नींना कोणतेही मुलबाळ झालेले नव्हते व नाही, दोघेही अपत्यहिन होते. तसेच मयत महमंदखॉ हयांचे वडील श्री. अब्दुलखों हे त्यांची मुले महमंदों व सलिमखों (अर्जदार) हयांचे लहानपणीच मरण पावले असून त्यांची आई नामे श्रीमती सरदारबो भ्र. अब्दूलखों पठाण हो दिनांक-१५/१०/२००४ रोजी मौजे कनकावतीनगर, कारखाना परिसर, कन्नड येथे मरण पावली. अर्जदार सलिमखॉ हा मयत महंमदखर्खा पठाण हयाचा सख्खा भाऊ असून मयत महमंदखों पठाण हयांना अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. मयतानं कुठलेही मृत्यूपत्र लिहून ठेवलेले नव्हते व नाही. अर्जदार हयास शासकीय व निमशासकीय कामांसाठी व अन्य शासकीय योजनांचे लाभासाठी कायदेशीर वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअथी, सदरहू जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळवण्यात येते की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत त्यांनो प्रस्तुतचा अर्ज बारस प्रमाणपत्र मिळणेसाटो या न्यायालयात केलेला आहे. सबब वरील वारसाहक्क प्रमाणपत्र अर्जदार हयांस प्रदान करणे बाबत कोणासही काही आक्षेप ऊजर असल्यास सदर प्रगटन प्रकाशीत झाल्याचे तारखेपासून ३० दिवसांचे आंत या न्यायालयात आक्षेप सादर करावा, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार हयांना मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाहक्क प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दि. ३१/०७/२०२५ रोजी माझे सहिनिशी व मा कोर्टाचं शिक्यानिशा दिले.

दि. ३१/०७/२०२५

आदेशावरून

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क स्तर कन्नड

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# मालेगाव : एक ऐतिहासिक निर्णय

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर आणि लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह सातही आरोपींची विशेष एनआयए न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्याचा निर्णय ऐतिहासिक आणि समस्त हिदूंना दिलासादायक म्हणावा लागेल. 'भगवान के घर देर है, अंधेर नहीं', असे म्हटले जाते. आता न्यायालयांच्या बाबतीतही तसेच म्हणावे लागेल. न्यायालयाच्या या निर्णयाने परमपवित्र आणि पूजनीय अशा भगव्या ध्वजाचे स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी राजकारण करणाऱ्या सडक्या मानसिकतेच्या काँग्रेसी नेत्यांच्या चेहऱ्याचा रंग उडाला असेल, यात शंका नाही.

१७ वर्षांनंतर या खटल्याचा निकाल लागला. न्यायालयाने या सर्वांची निर्दोष मुक्तता केल्याबद्दल आनंद व्यक्त करायचा की निर्दोष असताना एक-दोन नाही तर तब्बल १७ वर्षे या सर्वांना तुरुंगात अनन्वित हालअपेष्टा भोगाव्या लागल्या, अत्याचाराचा सामना करावा लागला, याबद्दल खेद व्यक्त करायचा, हे कळत नाही. साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर चतुर्वेदी, समीर कुळकर्णी आणि सुधाकर द्विवेदी या सात जणांची या खटल्यातून निर्दोष मुक्तता झाली. यातील रमेश उपाध्याय हे लष्करातील निवृत्त मेजर होते. या प्रकरणात लष्करातील काही अधिकाऱ्यांसह अभिनव भारत संघटनेच्या काही प्रमुख लोकांना आरोपी करण्यात आले होते. मालेगाव बॉम्बस्फोटात बळी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख आणि जखमींना ५० हजार रुपये देण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहे. मात्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली असली तरी या सातही जणांच्या आयुष्यातील मोलाची अशी जी १७ वर्षे वाया गेली, या काळात त्यांचे अपरिमित, जे आर्थिक, शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि कौटुंबिक असे कधीही भरून न निघणारे जे नुकसान झाले, त्याची भरपाई आता कोण आणि कशी करणार, याचे उत्तर मिळाले पाहिजे. लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासोबतच्या तुकडीतील सर्व सहकारी लष्करात मोठ्या पदांवर पोहोचले, ब्रिगेडियरही झाले, पण पुरोहित यांना त्याच पदावरून निवृत्त व्हावे लागले. हिंदू संघटनांच्या अनेक नेत्यांना षडयंत्रात फसवण्याचे कारस्थान काँग्रेसी नेत्यांनी रचल्याची कबुली या प्रकरणातील आता निवृत्त पण तेव्हा कार्यरत असलेल्या तपास अधिकाऱ्यांनी देत काँग्रेस नेतृत्वाच्या हिंदुविरोधी मानसिकतेचा बुरखा फाडला आहे. मालेगावात दोन बॉम्बस्फोट झाले. पहिला बॉम्बस्फोट ८ सप्टेंबर २००६ ला झाला, यात ३७ जण ठार झाले. विशेष म्हणजे या प्रकरणातील सर्व आरोपींची २०१६ मध्ये निर्दोष सुटका झाली. दुसरा बॉम्बस्फोट २९ सप्टेंबर २००८ ला झाला, यात ६ जण ठार, तर शंभरावर जखमी झाले होते. विशेष म्हणजे पहिल्या बॉम्बस्फोटातील बळीसंख्या कितीतरी जास्त असताना त्याचा पाहिजे तसा गाजावाजा झाला नाही, पण दुसऱ्या बॉम्बस्फोटातील बळीसंख्या कितीतरी पटीने कमी असताना जाणीवपूर्वक हे प्रकरण तापवण्यात आले. यातून हिंदू समाजाला लक्ष्य करण्यात आले. हिंदुस्थानात हिंदू समाजाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा, त्याचा बळीचा बकरा करण्याचा प्रयत्न झाला, ही अतिशय खेदाची बाब म्हणावी लागेल. सुदैवाने हिंदू समाजावर आलेले हे ग्रहण न्यायालयाच्या निर्णयाने सुटले आहे.

साध्वी प्रज्ञासिंह, प्रसाद पुरोहित यासह सात जणांना या बॉम्बस्फोट प्रकरणात पकडण्यात आले म्हणण्यापेक्षा यात अडकवण्यात आले, असे म्हणणे अधिक सयुक्तिक होईल. पहिला बॉम्बस्फोट हा अल्पसंख्यक समाजातील लोकांनी घडवला, तर दुसऱ्याचा दोष हिंदू समाजावर ढकलण्यात आला. देशात याआधीही अनेक बॉम्बस्फोट झाले, पण धर्माच्या आधारावर त्याची विभागणी कधी झाली नाही. पण यावेळी प्रथमच हिरव्या दहशतवादाला वाचवण्यासाठी भगव्या दहशतवादाचा उल्लेख करण्यात आला. काँग्रेस हा पक्ष सुरुवातीपासूनच हिंदुद्वेष्टा असल्यामुळे मुस्लिम तुष्टीकरणातून त्याने भगवा दहशतवादाचे नॅरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला, पण या देशातील सुजाण आणि संयमी हिंदूंनी त्याचा हा प्रयत्न हाणून पाडला. दहशतवादाला कोणताही धर्म आणि रंग नसतो, असे म्हटले जाते. न्यायालयाने आपल्या निकालातून याकडे लक्ष वेधले आहे. सर्व मुस्लिम दहशतवादी नाही हे खरे असले तरी सर्व दहशतवादी हे मुस्लिम आहेत, हे आपल्याला कसे विसरता येईल. विशेष म्हणजे भारतच नाही तर जगातील अनेक देश या हिरव्या दहशतवादाचे बळी ठरले आहेत. पहलगाम येथे निर्दोष भारतीय पर्यटकांची झालेली हत्या ही हिरव्या दहशतवादाची फलनिष्पत्ती म्हणावी लागेल. यावेळी प्रथमच धर्म विचारून आणि समोरची व्यक्ती हिंदू धर्माची असल्याची खात्री पटल्यानंतर त्याला बायको आणि मुलांसमोर गोळ्या घालण्यात आल्या, याकडे दुर्लक्ष कसे करता येईल. दहशतवादावर चढलेला हिरवा रंग पुसून काढण्यासाठी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी सर्वप्रथम भगवा दहशतवाद हा शब्द वापरला. नंतर पी. चिदंबरम्, काँग्रेसमधील वाचाळ नेते दिग्विजयसिंह यांनी भगव्या दहशतवादाचे तुणतुणे वाजवणे सुरू केले. काँग्रेस पक्ष आणि त्याचे नेते स्वतःला समाजवादी म्हणवत होते, पण ते कधी नमाजवादी झाले, ते त्यांनाही समजले नाही. अनिवासी भारतीय असे म्हटले जाते, म्हणजे जे भारतात राहात नाही, पण तनाने आणि मनाने भारतीय आहेत. तसेच काँग्रेस नेत्यांबद्दल म्हणावे लागेल. काँग्रेस नेते सुंता न करता स्वतःला मुस्लिम समजू लागले होते. हिंदू समाज हा सोशीक, सहिष्णू आणि संयमी असल्यामुळेच या देशात काँग्रेसचे फावले. हिंदू समाज आक्रमक झाला असता, त्याने रौद्ररूप धारण करत तांडव केले असते तर काँग्रेसला विशेषतः गांधी घराण्याला कधीच सत्तेवरून पायउतार व्हावे लागले असते, एवढेच नाही, तर आपला बाडबिस्तर गुंडाळून परदेशात विशेषत : इटलीला पळून जावे लागले असते. २०१४ मध्ये देशातील हिंदू समाजाने आपले खरे रूप दाखवले आणि काँग्रेसला पराभूत करत भाजपाला सत्तेवर आणले. आपल्याकडून वर्षानुवर्ष झालेल्या चुकीचे प्रायश्चित्त हिंदू समाजाने नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदावर एकदा, दोनदा नाही तर सलग तीनदा विराजमान करून घेतले. शंभर पापांचा घडा भरल्याशिवाय हिंदू समाज आक्रमक होत नाही, त्याला धडा शिकवल्याशिवाय राहात नाही. पण हिंदू समाजाने एकदा का सुदर्शन चक्र हातात घेतले की तो मग शिरच्छेद केल्याशिवाय कोणालाच सोडत नाही. हिंदू हा कालही दहशतवादी नव्हता, आजही नाही आणि उद्याही राहणार नाही, ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया देशातील कोट्यवधी हिंदूंच्या मनातील भावना म्हणावी लागेल. काँग्रेस पक्षात एकटे पडल्यानंतर तसेच भगवा दहशतवाद हे शब्द आपला राजकीय बळी घेतील, या भीतीतून सुशीलकुमार शिंदे यांनी, भगवा दहशतवाद हा शब्द माझा नव्हता, तर काँग्रेस नेतृत्वाच्या दबावामुळे मला तो वापरावा लागला, असा पश्चातबुद्धीचा आणि बालिश खुलासाही केला. पण 'बूंद से गई सो हौद से नहीं आती' हेच खरे. मालेगाव खटल्याच्या निकालानंतर दिग्विजयसिंह यांनीही मी कधीच भगवा दहशतवाद असा शब्द वापरला नसल्याचा हास्यास्पद दावा केला. हिंदू समाजाने देशातून काँग्रेसला पळता भूई थोडी केल्यानंतर काँग्रेस नेत्यांच्या डोक्यात चढलेले भगव्या दहशतवादाचे भूत उतरले. तसेही 'लाथों के भूत बातों से नहीं मानते' असे म्हणतात. काँग्रेस नेत्यांच्या डोळ्यावर भगव्या दहशतवादाचा चष्मा चढला होता, न्यायालयाने आपल्या निकालपत्रातून या सर्वांच्या चष्म्याच्या काचाच फोडून टाकल्या. दसरा आणि दिवाळीला अजून दोन-तीन महिन्यांचा अवकाश आहे, पण न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे देशात दिवाळीच्या आधीच दिवाळी साजरी करावी असा आहे. विशेष एनआयए न्यायालयाच्या न्यायाधीशांनी आपला निर्णय साध्या पेनाने लिहिला असला तरी तो सुवर्णाक्षरात नोंदवावा असा आहे, यात शंका नाही. सनातन काळापासून भगवा रंग हा आम्हाला त्यागाची, शौर्याची आणि बलिदानाची आठवण करून देणारा रंग आहे. भगवा झेंडा हा आम्हाला गुरुस्थानी आहे. मुघलांच्या हिरव्या निशाणाला खाली खेचत छत्रपती शिवाजी महाराजांनी भगव्या झेंड्याला समोर ठेवत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, हे आम्हाला कसे विसरता येईल?

## यंगिस्तान

# काँग्रेसचा 'तमाशा'!

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

सोलापूरच्या काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी ऑपरेशन सिंदूरला 'तमाशा' म्हटले आहे. त्या म्हणाल्या, ''सरकार सत्य लपवून फक्त माध्यमांमध्ये प्रशंसा मिळवत आहे. प्रत्यक्षात, ऑपरेशन सिंदूर हा एक तमाशा होता. ऑपरेशन सिंदूरमधून देशाला काय फायदा झाला? या कारवाईत किती दहशतवादी पकडले गेले? पाकिस्तानने भारताची किती विमाने पाडली? या कारवाईत झालेल्या चुकांसाठी कोण जबाबदार आहे?'' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. खरं तर सैन्याने याबाबत पत्रकार परिषद घेऊन अनेक बाबी स्पष्ट केल्या आहेत. कदाचित प्रणिती शिंदेंना भाषण लिहून देणाऱ्यांनी याबाबत माहिती मिळवलेली दिसत नाही. अर्थात प्रणिती शिंदे स्वतःच्या मनाने काही बोलत नाहीत. त्यांना त्यातलं किती कळतं हा संशोधनाचा विषय आहे. याचं कारण असं की ''भगवा दहशतवाद'' ही संकल्पना प्रणिती यांचे तीर्थरूप सुशीलकुमार शिंदे यांनी मांडली होती. हे काँग्रेसचं कारस्थान होतं अशी कबुली स्वतः शिंदेंनीच दिली आहे. हायकमांड आणि ज्येष्ठांनी सांगितल्यामुळे त्यांनी असे विधान केल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे ज्याप्रमाणे सुशीलकुमार शिंदे हे खाल्ल्या मिठाला जागणारे आहेत, त्याचप्रमाणे त्यांच्या कन्या देखील खाल्ल्या मिठाला जागणाऱ्या असू शकतात अशी शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच इथे स्पष्ट करावेसे वाटते की जरी प्रणिती यांनी ऑपरेशन सिंदूरला तमाशा म्हटले असले तरी प्रत्यक्षात काँग्रेसनेच तमाशा चालवलेला आहे, असं म्हणायला बराच वाव आहे.

नुकताच मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा निकाल लागला आणि सर्व हिंदू आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण हे भारताच्या इतिहासात एक गंभीर वळण घेऊन आलेलं प्रकरण आहे, ज्यामध्ये केवळ निष्पाप लोकांचा मृत्यूच झाला नाही, तर हिंदू समाजावर ''हिंदू दहशतवाद'' नावाचा एक खोटा शिक्का मारण्याचा कट रचला गेला. या प्रकरणातून काँग्रेसने हिंदुत्वाला बदनाम करण्याचा एक योजनाबद्ध डाव आखला. २००८ मध्ये मालेगाव येथे झालेल्या बॉम्बस्फोटात सुरुवातीस मुस्लिम अतिरेक्यांवर संशय घेतला गेला होता. मात्र, एका कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी ''प्रत्येक वेळी मुसलमानच कसा पकडला जातो?'' असे प्रश्नचिन्ह निर्माण केले आणि जणू जादूची कांडी फिरवल्यासारखे मुस्लिम आरोपी गायब झाले आणि त्या जागी हिंदू आरोपी आले. विशेष म्हणजे या सर्व काळात राष्ट्रवादी काँग्रेसचा गृहमंत्री होता. शरद पवारांचं राजकारण रोमांचक आहे. त्यांनी कधीही मुख्यमंत्रिपदासाठी आग्रह धरला नाही, मात्र गृहमंत्री त्यांच्या पक्षाचा असेल यासाठी ते आग्रही असायचे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाही गृहमंत्रिपद त्यांनी स्वतःकडे ठेवून घेतलं होतं. त्यातूनच बार मालकांकडून १०० कोटींची वसुली, जिलेटिन कांड्याचा कांड, सुशांत-दिशा, मनसुख हिरेन असे अनेक संशयासद मृत्यू, सचिन वाझे, अनंत करमुसे अपहरण व मारहाण आणि इतर बरीच प्रकरणे समोर आली. लक्षात घ्या अत्याधुनिक युगात इतका



घोळ घातला गेला तर जेव्हा सोशल मीडिया वगैरे नव्हता तेव्हा काय काय घडलं असेल, याचा विचार करूनच अंगावर काटा येतो. तर मालेगाव स्फोट प्रकरणात काही दिवसांतच काँग्रेस सरकारच्या दबावाखाली एटीएसने एक वेगळेच कथानक तयार केले. या कथानकात साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल पुरोहित यांच्यासारख्या व्यक्तींवर अतिरेकी असल्याचे आरोप ठेवण्यात आले. विशेष म्हणजे, या व्यक्तींना कोणताही ठोस पुरावा नसताना वर्षानुवर्षे तुरुंगात डांबून ठेवण्यात आले. त्यांना मानसिक आणि शारीरिक त्रास देण्यात आला.

'हिंदू दहशतवाद' ही संकल्पना काँग्रेसने केवळ मुस्लिम तुष्टीकरणासाठी आणि जिहादी दहशतवादाच्या वास्तवावरून जनतेचं लक्ष विचलित करण्यासाठी निर्माण केली असली तरी त्यांचा मूळ उद्देश मुस्लिम तुष्टीकरणातून निवडणूक जिंकणे असा होता. तत्कालीन गृहमंत्री पी. चिदंबरम्, सुशीलकुमार शिंदे आणि काँग्रेसचे काही नेते जाणीवपूर्वक हे कथानक जनतेसमोर मांडत होते. काँग्रेसच्या या भूमिकेमुळे संपूर्ण हिंदू समाजाला संशयाच्या छायेत आणण्याचा प्रयत्न झाला. मात्र अखेर सत्य जगासमोर आलेच. निवृत्त पोलिस अधिकारी मेहबूब मुजावर यांनी या प्रकरणावर प्रकाश टाकताना सांगितले की, एटीएसने खोटे पुरावे तयार करून काही आरोपींना अडकवले. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, काँग्रेस सरकारच्या आदेशावरून हे सर्व घडले. मुजावर यांच्या म्हणण्यानुसार, मालेगाव बॉम्बस्फोटानंतर सापडलेले काही खरे आरोपी सोडून दिले गेले आणि त्यांच्या जागी निर्दोष हिंदू व्यक्तींना अडकवले गेले. या खोट्या कथानकाचा सर्वांत घृणास्पद भाग म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांना या कटात अडकवण्याचा प्रयत्न होता. काँग्रेसच्या माध्यमांमार्फत असे दाखवले गेले की, मालेगाव स्फोटामागे काही संघटनांचा हात आहे. यामागचा उद्देश स्पष्ट होता, तो म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संपूर्ण हिंदू राष्ट्रवादी विचारसरणीला दहशतवादाच्या छायेत आणणे. पण वेळ येताच कोर्टाने आणि तपास संस्थांनी या आरोपांना निराधार ठरवलं. खरंतर यासाठी मेहबूब मुजावर यांचे आभार मानायला हवे. मात्र या कटात सहभागी न झाल्याने मेहबूब यांनाही त्रास देण्यात आला, त्यांच्यावरही खोटे आरोप ठेवण्यात आले.

सप्टेंबरमध्ये मालेगाव स्फोट झाला आणि २००८ च्या नोव्हेंबरमध्ये आणखी एक भयानक घडली, ती म्हणजे मुंबई दहशतवादी हल्ला. यात हेमंत करकरे यांचा मृत्यू झाला. त्यांच्या हत्येचे आरोपही हिंदू समाजावर टाकण्यात आले. त्याहीपेक्षा भयंकर गोष्ट अशी की कसाब व त्याच्या साथीदारांनी केलेल्या जिहादी हल्ल्याचे खापर हिंदू समाजावर मारण्याचा प्रयत्न होणार होता. जर तुकाराम ओंबळे यांनी कसाबला जिवंत पकडलं नसतं तर ते सगळे अतिरेकी हिंदू होते असं दाखवण्याचा प्रयत्न झाला असता. या षडयंत्राचा भाग म्हणूनच हिंदूंवर करकरेंच्या हत्येचा आरोप टाकण्यात आला. भाजप नेते अवधूट वाघ यांनी एक महत्त्वाचे विधान केले आहे. वृत्तवाहिन्यांवरील चर्चेत ते म्हणाले की, ''प्रज्ञा ठाकूर यांना पकडून संपूर्ण हिंदू संत समाज, मेजर उपाध्याय आणि कर्नल पुरोहित यांना पकडून संपूर्ण लष्कर आणि अभिनव भारतला गुंतवून स्वातंत्र्यवीर सावरकर आणि कट्टर हिंदुत्वनिष्ठ अशी सावरकरांची फौज या सर्वांना बदनाम करण्याचं कारस्थान जर कोणी रचलं असेल तर त्या माणसाचं नाव आहे शरदचंद्र पवार.'' म्हणजे काँग्रेस व त्यांच्या संस्कृतीतील लोकांना भारतीय समाज रचनाच मोडून पाडायची होती. हिंदू संतांना आरोपी बनवलं तर हिंदुत्वाचा पाया ढासळेल, लष्करातील लोकांना पकडलं तर भारतीय संरक्षण यंत्रणा कोलमडून पडेल आणि हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांना अडकवलं तर समाजरचना विस्कळीत होईल. या तिन्ही घटकांमुळे भारत देश सुरक्षित आणि सुस्थितीत आहे. या घटकांवर हल्ला चढवला तर भारतीय व्यवस्था ढासळेल. म्हणजे केवढं मोठं षडयंत्र होतं! हे केवळ निवडणूक जिंकण्यासाठी असेल तर हे पाशवी आहे.

या प्रकरणाबाबत एनआयए कोर्टाने सांगितले की, आरोपींविरुद्ध पुरावा अपुरा असून त्यांनी काहीही चुकीचे केलेले नाही. या निर्णयानंतर हे स्पष्ट झाले की, काँग्रेस सरकारने निव्वळ राजकीय हेतूने निर्दोष हिंदूंना अतिरेकी ठरवले होते. हा खरं तर भारतीय न्यायप्रणालीवरचा विश्वास डळमळीत करणारा प्रकार होता. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी या प्रकरणावर भाष्य करताना म्हटले की, ''हिंदू कधीही टेररिस्ट होऊ शकत नाही.'' हे विधान केवळ राजकीय नव्हे, तर ऐतिहासिक सत्य आहे. भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासात हिंदूंनी अन्यायाविरुद्ध लढा दिला, पण कधीही अतिरेकी मार्ग अवलंबला नाही. हिंदू क्रांतिकारक असतो, अतिरेकी नव्हे.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल फेकरीकर**

# पोलिस पाटलांनाही आता बंदूक द्यावी?

गस्त हा शब्द पोलिस खात्यासाठी नवा नाही. आपल्या भागात कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिस समूहाने सरकारी वाहनाने गस्तीवर असतात. या काळात ते संशयास्पद हालचालींवर नजर ठेवतात अन् काही चुकीचे वाटल्यास त्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करतात. मात्र हीच कृती करताना पोलिस पाटील गावात एकटाच असतो. यामुळे आता त्यांच्याही सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येऊ शकतो. त्यामुळे स्वसंरक्षणासाठी पोलिस पाटलांना बंदूक अर्थात रिव्हॉल्व्हर द्यायला हवी, असाही विचार पुढे आला आहे. काही गावांमध्ये पोलिस पाटलांवर जीवघेणे हल्ले झाले आहेत. तो भूतकाळ पाहता भविष्यकाळ चांगला व्हावा याकरिता रिव्हॉल्व्हर खूप काही साध्य करू शकते. संपूर्ण राज्याचा विचार करता पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या २ लाख २९ हजार ९६२ एवढीच आहे. तर लोकसंख्या पाहता ती १२ कोटी ८६ लाख ५९ हजारांच्या वर आहे. आता एवढ्या मोठ्या लोकसंख्येला सांभाळणे दोन लाख कर्मचाऱ्यांना शक्य नाही. विशेष म्हणजे पोलिस फक्त शहरांवर लक्ष केंद्रित करतात, मात्र गावखेड्यांचे काय? तिथे तर गुन्हेगार धिंगाणा घालून गावकऱ्यांचे नुकसान करतात अन् कायद्यालाच आव्हान देतात. या स्थितीत राज्यातील ३८ हजारपेक्षा जास्त असलेल्या पोलिस पाटलांची मदत घेण्याचा विचार गृहमंत्रालय करीत आहे. नव्हे नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यात अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांनी चक्क गावखेड्यात पोलिस पाटलांकडून गस्त सुरू करून नवा प्रयोग यशस्वी करून दाखविला. आता त्यांनी तो प्रयोग संपूर्ण नागपूर जिल्ह्यात सुरू केला आहे. हा प्रयोग खरोखरच चांगला आहे. पण



पोलिस पाटील जेव्हा गस्तीवर असतो तेव्हा त्याला त्याच्याही जीवाची भीती असते. त्याचा विचार करता त्यांना बंदूक अर्थात रिव्हॉल्व्हर देणे काळाची गरज असल्याची भूमिका पोलिस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष दीपक पालीवाल यांनी मांडली आहे. तसे पाहता पोलिस भरतीनुसार पोलिस पाटलांची नियुक्ती सर्व नियम पाळून केली जाते. म्हणूनच की काय वर्तमानात पोलिस पाटलांना १५ हजार रुपये महिना मानधन दिले जाते. पूर्वी याच पोलिस पाटलांना केवळ २५ रुपये मानधन दिले जायचे. पण दीपक पालीवाल यांचा लढा चमत्कारिक ठरला. सुरुवातीला त्यांचे मानधन केवळ २५ रुपये होते. नंतर ते ३०० रुपये, ५०० रुपये, ८०० रुपये, ३ हजार रुपये, ६५०० रुपये आणि आता १५ हजारांच्या घरात पोहोचले आहे.

हा लढा सोपा नव्हता, याकरिता दीपक पालीवाल यांना घरावर तुळशीपत्र ठेवत अहोरात्र झटावे लागले. पोलिस पाटलांचा इतिहास जेव्हा केव्हा लिहिला जाईल तेव्हा दीपक पालीवाल यांच्या कार्याची नोंद सुवर्ण अक्षराने होईल, हे मात्र नक्की. आता प्रश्न हा आहे की, पोलिस पाटलांची गस्त खरोखरच लाभदायक ठरणार काय? तर त्याचे उत्तर नक्कीच हो असेच द्यावे लागेल. गावात दुपारी वृद्ध व्यक्ती सोडले तर सर्व जण शेतात पिकांच्या मशागतीसाठी जातात. यामुळे गावात कुणीही राहात नाही. मग काय हीच संधी साधत चोरांच्या टोळ्या फेरीवाल्यांच्या वेषात येऊन घरफोड्या करतात. त्यावर आळा बसावा म्हणून सकाळी ११ ते ६ या काळात पोलिस पाटलांना गस्त घालण्यास सांगितले आहे. शिवाय गावात येणाऱ्या प्रत्येक फेरीवाल्याचे छायाचित्र, आधारकार्ड पोलिस पाटलांनी जमा करून ठेवायचे. गावातील जाणाऱ्या आणि येणाऱ्या मार्गावर ग्रामपंचायतच्या मदतीने सीसीटीव्ही लावायचे असेही कार्य त्यांच्यावर सोपविण्यात आले आहे. पण फेरीवाल्यांकडून फोटो आणि आधार कार्ड मिळवणे सोपे नाही. अनेकदा ते नकार देतील किंवा वादविवाद करतील. अशावेळी पोलिस पाटलांनी नेमके करायचे काय? हाही मुद्दा तापदायक ठरेल. पण समजा पोलिस पाटलांच्या कंबरेला सरकारने दिलेली बंदूक दिसली तर धाकापोटी का असेना फेरीवाल्यांच्या रूपातील गुन्हेगारही गुपचूप फोटो काढू देतील. शिवाय काळानुरूप पोलिस पाटलांना खाकी वर्दी द्यायला हवी. शेवटी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे हेच मोठे आव्हान प्रत्येक सरकारपुढे असते. ते आव्हान पोलिस पाटलांच्या मदतीने लीलया पेलता येणे शक्य आहे. महाराष्ट्रात सुमारे ४३ हजार ७२७ गावे आहेत. या सर्व गावांमध्ये पोलिस यंत्रणा जाऊ शकत नाही. अशावेळी पोलिस पाटील गृहमंत्रालयासाठी शांततादूत ठरू शकतात. नव्हे हे प्रत्यक्षात आले तर पोलिसांवरील ताण कमी होईल अन् गावागावात शांतताही नांदेल. याच शांततेत प्रगती दडलेली असते, नाही का?

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

# जनतेनेच वापरावा विवेक

**नागेश दाचेवार**

नुकतेच लोकसभेत सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी ऑपरेशन सिंदूरला तमाशाची उपमा देऊन, स्वतःचा तमाशा करून घेतला. नेटकऱ्यांनी समाजमाध्यमांवर प्रणिती शिंदेंचा पुरता तमाशा उडवला. तसे तमाशे तर यांचे नेते राहुल गांधीदेखील सतत करत असतात. महाराष्ट्रातील यांचा सहकारी संजय राऊत नावाच्या गृहस्थांचा रोजचा तमाशा सुरू असतो. एवढंच कशाला प्रणिती शिंदेंचे वडील सुशीलकुमार शिंदेंनी मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांना वीज मोफत देतो सांगून, शेतकऱ्यांचा भावनांचा तमाशा मांडला होता. आणि हो... हिंदू, भगवा आतंकवाद म्हणून हिंदूंच्या भावनांचा तमाशा करणारेदेखील यांचेच पिताश्री होते, बरं का! त्यामुळे तमाशा आणि यांचा तसा जवळचा संबंध आहे. मुख्यमंत्री पदावर असताना वडील जसे दहशतवादासारख्या संवेदनशील विषयाचादेखील तमाशा करायचे, ते बघून कदाचित इतरही राज्यकर्ते असेच असंवेदनशील असतील आणि असाच तमाशा करत असतील, असा गैरसमज मॅडमला झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा कालांतराने पक्षाच्या वरिष्ठांच्या सांगण्यावरून भगवा दहशतवाद शब्द मी वापरला. मात्र, तो वापरायला नको होता. अशी उपरती त्यांच्या पिताश्रींना झाली. अशाच पद्धतीने वरिष्ठांच्या सांगण्यावरून प्रणितीने भारतीय सेनेच्या शौर्याचा, या भ्याड हल्ल्यात पती गमावलेल्या वीरपत्नींच्या कुंकवाचा, भारतीय अस्मितेचा अवमान केला खरा, मात्र त्यांनाही कालांतराने आपण चुकल्याची जाणीव होईल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

आता उबाठा गटाकडे २० आमदार आहेत. तेदेखील चळवळी, आंदोलने वगैरे काही करताना दिसत नाही. सभागृह आणि सभागृहाबाहेर रस्त्यावर कुठेही यांचं अस्तित्व दिसत नाहीत. जनसुरक्षा विधेयकाला साधा विरोध वीसपैकी आदित्य ठाकरेंसह एकाही सदस्याने केला नाही. शेवटी पक्षप्रमुखाला स्वतःला येऊन विरोध करत असल्याचा आवा आणावा लागला. मात्र, त्यांनीही सभागृहात उपस्थित असतानादेखील सभागृहात अधिकृत विरोध केला नाही. यांचे नेते संयुक्त चिकित्सा समितीत होते. तेथे यांचं कोणी ऐकले नसेल तर, भिन्नमतपत्रिका (डिसेंटिंग नोट) ते देऊ शकले असते, कायदा संमतीसाठी सभागृहात मांडला तेव्हा, मतदान (डिव्हिजन) मागू शकले असते. पण यापैकी कुठलाही संवैधानिक, न्यायिक मार्ग या लोकांनी पत्करला नाही. केवळ माध्यमांसमोर ता-ता थैय्या केला. करतो म्हटलं तर करण्यासारखं बरंच काही होतं. मात्र, इच्छाशक्ती नव्हती आणि इच्छाशक्तीच नसेल तर मग तुम्ही काहीही करू शकणार नाही हे वास्तव आहे. त्यामुळे केवळ राजकीय तमाशा करण्यापलीकडे दुसरा पर्याय उपलब्ध नसतो. नेमकं तेच आताचे विरोधक करत आहेत.

बरं अशा या राजकीय तमाशांमध्ये केवळ पुढारीच आहेत असे नाही. यात प्रसार माध्यमं आणि त्यांचे काही अतिउत्साही संपादक किंवा पत्रकार देखील हिरिरीने सहभागी होताना दिसतात. याचं ताज उदाहरण द्यायचं झालं तर, कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंसह मंत्रिमंडळातील ८ नेत्यांची विकेट उडणार, असल्या संजय राऊतांनी पेरलेल्या तकलादू हवाहवाई बातमीला डोक्यावर घेणे होय. आपल्या शिल्लक सेनेचे नेते आणि कार्यकर्त्यांना सांभाळून ठेवणे किंवा त्यांच्या आशा पल्लवित ठेवण्यासाठी आणि सत्ताधाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरविण्यासाठी स्वतःच्या मालकीच्या वृत्तपत्रातून काहीही निराधार असे छापून आणायचा एकमेव धंदा उबाठा आणि त्यांच्या नेत्यांकडून चालला आहे. विशेषतः संजय राऊतांकडून. आता त्यांच्यावर परिस्थिती अशी आली आहे की, असा राजकीय तमाशा ते करण्यापलीकडे दुसरा पर्याय त्यांच्याकडे नाही, हे समजू शकतो आपण. पण माध्यमांनी आपलं भान का सोडलंय्... या अशा खोटारड्या लोकांचीच री ओढत आरडाओरडा करायला लागतो. काही काही तर त्यांच्याच घरी शोककळा पसरल्यागत मातम करायला लागतात. वैचारिकदृष्ट्या माणूस कुठेना कुठे जुळलेला असतो, इथपर्यंत ठीक आहे. मात्र, इतकं लाळचाटेपणा किंवा तळवे चाटण्याचा माध्यमांच्या प्रतिनिधींनी अलिकडे चालविलेला प्रकार म्हणजे कळसच म्हणावा लागेल. बरं शिट्टी वाजविली की पळत जाऊन तळी उचणाऱ्या माध्यमांनी आज महासंपादक बनविलेल्या या राऊतांची पत किती हे उद्धव ठाकरेंनी आधीच दाखवून दिली आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी वृत्तपत्राच्या संपादकपदाचा राजीनामा दिला आणि त्या जागी आपल्या पत्नीला, रश्मी ठाकरेंना संपादक बनविले. परत ठाकरे पायउतार झाल्यावर पुन्हा स्वतः संपादक झालेत. मात्र, राऊतांना कार्यकारी संपादकपदावरून संपादक बनविले नाही. कारण उद्धव ठाकरे सुद्धा राऊतांचं काय ते चांगल्यानं ओळखून आहेत. पण माध्यमांना अद्याप उमगलेलं दिसत नाही. सकाळी उठून फेकाफेकी केली, की माध्यमं लगेच उडू लागतात, अशी परिस्थिती झाली आहे. राऊतांच्या फेकाफेकीतली सत्यता पडताळण्याचे कष्ट घ्यायलादेखील कोणी तयार नाहीत. शेवटी सत्य तर लपत नाही ते पुढे आलं की, असे सांगीवांगीचे वृत्त चालविल्यानंतर तोंडावर आपटावे लागते एवढंच काय ते वाट्याला येतं. दिवस भरायच्या नादात हे लोकं भेटेल ते प्रसारित करतात. यामुळे यांचा दिवस निघतो. मात्र, अवघ्या माध्यमांच्या विश्वासार्हतेला कायमस्वरूपी धक्का बसतो. याचा विचार आज माध्यमं करायला तयार नाहीत. यावेळी राजकीय पक्षांनी, त्यांच्या नेत्यांनी आपल्या राजकीय अस्तित्वासाठी तमाशा चालविला असून, माध्यमं देखील या तमाशात आपला उत्स्फूर्त सहभाग दर्शविताना दिसत आहे. त्यामुळे आता राहुल गांधी जे विदेशात जाऊन आपल्या देशाचा तमाशा मांडण्याचा प्रयत्न करतात, संजय राऊत राज्यात तमाशाचा फड चालवतात, त्या फडात आता प्रणिती शिंदेंनी नव्याने प्रवेश केलाय्. माध्यमांनी तर आधीच याचा भाग होण्याचा बहुमान पटकावला आहे. या एकमेकांच्या साथीने दहशतवाद आणि नक्षलवादासारख्या राष्ट्रीय सुरक्षेच्यादृष्टीने अत्यंत संवेदनशील विषयासंदर्भात चालविलेल्या राजकीय तमाशावर आता राज्यातील जनतेने सद्सदविवेकाने विचार करण्याची गरज आहे.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### मैत्री : एक सर्वांगसुंदर अनमोल नातं

मैत्री हे मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ व प्रत्येकाच्या जीवनात विशेष स्थान असणार नातं. माणूस हा समाजशील प्राणी आहे, तो एकटा राहू शकत नाही. मानवी मन हे असंख्य सुखद-दुःखद भावनांनी भरलेलं असतं व त्याला त्याच्या भावना व्यक्त करण्यासाठी कुणाचीतरी गरज असते आणि त्याची ही गरज एक खरा मित्रच पूर्ण करू शकतो कारण मित्रच आपलं अस हक्काचं ठिकाण आहे ज्याच्याजवळ आपण आपल्या भावना मनसोक्तपणे व्यक्त करू शकतो. जीवनाच्या वाटेवर आपल्याला बरेच व्यक्ती भेटतात पण प्रत्येकाशीच आपली मैत्री होत नाही. पण काही व्यक्ती अशा असतात ज्यांना पाहून पूर्वजन्मीचे काहीतरी ऋणानुबंध असल्यासारखे वाटते. त्यांच बोलणं, वागणं मनाला स्पर्श करतं. मग ओळख वाढते, बोलचाल वाढते, सहवास वाढतो, आचार-विचार, आवडी -निवडी जुळतात व एकमेकांवर विश्वास जडतो आणि उदयास येतं एक सर्वांगसुंदर अस मैत्रीचं नातं. मैत्री हे जीवनातील सर्वश्रेष्ठ अस नातं आहे कारण या नात्यांमध्ये कसलंच बंधन नसतं. ना वयाच, ना वर्णाचं, ना जातीचं, ना धर्माचं. लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, उच्च-नीच असा कुठलाच भेदभाव केला जात नाही असं रक्ताच्या नात्यापेक्षाही पलीकडलं नातं म्हणजे मैत्रीचं नातं कारण ज्या गोष्टी आपण आपले कुटुंबीय, नातेवाईक यांच्यासोबत व्यक्त करू शकत नाही त्या गोष्टी मात्र आपण आपल्या मित्रा सोबत बिनधास्तपणे व्यक्त करू शकतो. ज्याच्याजवळ मनातील भाव व्यक्त करताना संकोच वाटत नाही, ज्याच्याशी खोटे बोलावेसे वाटत नाही, ज्याच्याजवळ पाप पुण्याची कबुली देण्यास मन कचरत नाही, केलेल्या चुकांची कबुली द्यायला कमीपणा वाटत नाही, जो आपल्या सुखदुःखाशी एकरूप होऊ शकतो तोच खरा मित्र.

कार्यालयात दररोज सात आठ तास सोबत राहणारी व्यक्ती आपला मित्र होईलच असे नाही उलट महिन्यातून कधीकधी बोलणारी वर्षातून कधीतरी भेटणारी व्यक्ती सुद्धा आपला चांगला मित्र असू शकतो त्याचे कारण म्हणजे एकमेकांवरचा विश्वास. मोबाईलमुळे जवळ आलेल्या व मनाने दूर गेलेल्या आजच्या स्वार्थी व अत्यंत धावपळीच्या युगात प्रत्येकाला एका खऱ्या मित्राची नितांत गरज आहे, कारण आज आपण पाहतो की प्रत्येक जण हा कुठल्यातरी विवंचनेत आहे. कौटुंबिक, सामाजिक, कार्यालयीन, व्यावसायिक, आर्थिक इत्यादी समस्यांमध्ये पार गुंतून गेला आहे व आतल्या आत गुरफटला गेला आहे व यातूनच नैराश्यग्रस्त होऊन आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याच्या निर्णयापर्यंत जात आहे त्यासाठी त्याच्या मनातील भावना, त्याच्या व्यथा समजून घ्यायला, योग्य-अयोग्य जसेच्या तसे सांगायला आरशाप्रमाणे खऱ्या मित्राचीच गरज असते. शेवटी जिथे सुख सांगायला शब्दांची गरज नसते, दुःख दाखवायला अश्रूंची गरज नसते, न सांगताच जिथे सर्व काही समजते तीच खरी मैत्री असते. ज्यांनी हे मैत्रीचं पवित्र नातं खऱ्या अर्थाने जाणलं, या मैत्रीच्या नात्याला निःस्वार्थपणे जपलं आणि या नात्याचा आनंद घेऊन मित्रांसोबत जीवन जगलं अशा तमाम मित्रांना मैत्री दिनाच्या शुभेच्छा.

**राहुल भगवान पुरी**/यवतमाळ

### मैत्री : मनाला जोडणारा एक धागा

'मैत्री' हा शब्द उच्चारताच मनात एक वेगळीच ऊब आणि जिव्हाळा दाटून येतो आणि चेहऱ्यावर हसू फुलते. प्रत्येकाच्या आयुष्यात काही अशा व्यक्ती असतात जे रक्ताचे नाते नसतानाही आपल्या मनाशी निखळ नाते जोडून राहतात. हेच असतं मैत्रीचं अद्वितीय बंधन. ३ ऑगस्टला फ्रेंडशिप डे निमित्ताने आपण प्रत्येकजण अशाच मित्रत्वाच्या नात्याला उजाळा देणार आहोत. मैत्री म्हणजे काय? मैत्री म्हणजे आधार. मैत्री म्हणजे मनमोकळेपणा. कोणतेही मुखवटे न घालता आपण जसे आहोत तसे आपल्याला स्वीकारणारी आणि समजून घेणारी माणसं म्हणजे मित्र. सुख-दुःखाची वाट एकत्र चालणं म्हणजे मैत्री. ज्याच्याशी बोलताना वेळ कधी सरतो हे कळत नाही आणि ज्याच्यासोबत गप्पा मारताना मन शांत होते तो खरा मित्र. आयुष्यात मैत्रीचं स्थान हे वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यात वेगवेगळे असतं. बालपणीची मैत्री ही निरागस असते. चिखलात खेळणे, खाऊ वाटून खाणे ही सुरुवात असते आपल्यातल्या मैत्रीच्या भावनेची. तर तरुणपणीची मैत्री ही खंबीर असते. शिक्षण, परीक्षा, करीअरचा, कामाचा ताण यातून सावरणारा एक आधाराचा हात देणारा मित्र या वयात प्रत्येकाला असावा. अडचणीच्या काळात साथ देणारा, हसवणारा, समजून घेणारा तो तरुणपणीचाच मित्र असतो. आयुष्यात विविध जबाबदाऱ्या पेलताना व संसार सांभाळताना शरीर थकल्यावर उतारवयातही एखादा असा मित्र असावा. जो तुमच्या सोबत जुने दिवस आठवून व तुम्हाला आधार देऊन तुमचा एकटेपणा दूर करू शकतो, तो असतो प्रौढ वयातील समजूतदार मैत्र. मैत्रीचे अनमोल क्षण हे माणसाला वेळोवेळी आठवत असतात. रात्री उशिरापर्यंत केलेल्या गप्पा. दुःखात आलेले ''मी आहे ना!'' हे दोन शब्द. एकत्र केलेली धडपड, भांडणं आणि पुन्हा एकत्र येणं म्हणजे मैत्री.फ्रेंडशिप डे च्या दिवशी आपल्या मित्राला नुसतं रंगीत रिबीन बांधून फ्रेंडशिप डे साजरा करायचा नसतो. तर आपल्या मित्राला खरंच वेळ देऊन त्याच्या सुख-दुःखात सहभागी होऊन एक नवा विश्वास देणं हे फ्रेंडशिप डे च खरं सेलिब्रेशन आहे. मैत्री ही मनुष्याच्या जीवनात येणारी सर्वांत मोठी संपत्ती आहे. जी ना कुठे विकत मिळते, ना कोणाला मागून मिळते. जिच्यासाठी कधीकधी वेळ नाही, पण जिच्यासाठी मन मात्र नेहमी आहे ती मैत्री जन्मभर कायम राहते. मैत्री जपली पाहिजे, कारण ती वेळेने नाही तर मनाने जोडलेली असते आणि मन जोडणारी नातीच आपले आयुष्य समृद्ध करतात. सर्वांना मैत्रीदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# परभणीच्या बसस्थानकांत ऑटोरिक्षा आणि खाजगी वाहनांचा मोठा धुमाकूळ

## नागरिक हैराण- बसेसह प्रवाशांचे ये-जा करणे आता झाले अधिक मुश्कीलच

**मोहन धारासूरकर**
**परभणी/प्रतिनिधी-**
परभणी सारख्या जिल्हा मुख्यालय स्थानच्या बसस्थानकावर शेकडो ऑटोरिक्षा आणि दुचाकी, चारचाकी वाहनांचा मोठा धूमाकुळ सुरु आहे. त्यामुळे बसचालक अक्षरशः हैराण आहेत. तर बसेससह प्रवाशांना ये-जा करणे मुश्किल बनले आहे.

जिल्हा मुख्यालय स्थानचे नवीन बसस्थानक उशीरा का होईना कार्यान्वित झाले आहे. भव्य दिव्य आणि सुंदर अशा बसस्थानकाच्या या इमारतीने निश्चितच शहराच्या सौंदर्यात भर घातली आहे. दुर्देवाने या नवीन बसस्थानकावर सुध्दा मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार सुरु झाले आहेत. विशेषतः स्वच्छतेच्या नावाने मोठी बोंबाबोंब आहे. ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग, धूळीचे आणि दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. त्यातच आता ऑटोरिक्षांसह खाजगी दुचाकी व चारचाकी वाहनांचा थेट बसस्थानकातील वावरही डोकेदुखी ठरला आहे. पहाटेपासून



रात्री उशीरापर्यंत शेकडो ऑटोरिक्षा प्रवाशांना आकर्षित करण्याकरीता बसस्थानका अंतर्गत प्लॅटफॉर्मवरच उभ्या राहु लागल्या असून हे ऑटोरिक्षा चालक बसमधून उतरलेल्या प्रवाशांना स्वतःकडे खेचण्याकरीता अक्षरशः स्पर्धा करु लागले आहेत. त्यामुळे प्रवाशीही अक्षरशः गांगरले आहेत. ऑटोरिक्षांच्या या सुळसुळाटामुळे परिवहन महामंडळाच्या बसेसला या परिसरातून ये जा करणंसुध्दा जिकिरीचे बनले असून त्यामुळे दररोज वाद-विवाद, हमरी-तुमरी व भांडण-तंटेसुध्दा नित्याचेच झाले आहे.

वास्तविकतः या ऑटोरिक्षांकरीता बसस्थानकाच्या समोर पार्कींग झोन सुरु करुन देण्यात आले आहे. परंतु, या ऑटो झोनवर ऑटोरिक्षा उभे राहिनासे झाले आहेत. त्याऐवजी थेट प्रवाशांना खेचण्याकरीता बसस्थानकातच त्या धडकू लागल्या आहेत. या व्यतिरिक्त दुचाकी, तीनचाकी खाजगी वाहनांनीही बसस्थानकात धुमाकूळ सुरु केला आहे. त्यामुळे बसेससह प्रवाशांनासुध्दा ये जा करणे मुश्किल बनले आहे.

शहर वाहतूक पोलिस यंत्रणेच्या कर्मचाऱ्यांद्वारे या बसस्थानकाच्या परिसरात कोणत्याही उपाययोजना केल्या जात नाहीत. त्यामुळे बसस्थानकाच्या बाहेरसुध्दा ऑटोरिक्षा बेशिस्त पध्दतीने उभ्या राहु लागल्या आहेत. त्यामुळे अन्य प्रश्नही निर्माण झाले आहेत. शहर वाहतूक पोलिस यंत्रणेने किंवा राज्य परिवहन महामंडळाने या बेशिस्त वाहनांसह ऑटोरिक्षांच्या धुमाकुळा विरोधात कठोर भूमिका घ्यावी, असा सूर जाणकार नागरीकांमधून उमटत आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### गोदावरी नदीचे पात्र दुथडी भरुन वाहु लागले

#### जायकवाडीच्या जलाशयातून पाण्याचा विसर्ग : नदीकाठच्या गावांना इशारा

**परभणी,/प्रतिनिधी :** जायकवाडी प्रकल्पातील पाणी पातळीत मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पाटबंधारे खात्याने जायकवाडीचे १८ दरवाजे उघडून गोदावरी नदी पात्रात ९ हजार ४३२ क्यूसेक पाण्याचा विसर्ग सुरु केला असून त्यामुळे परभणी जिल्ह्यातील गोदावरी नदीचे पात्र दुथडी भरुन वाहू लागले आहे.

जायकवाडी जलाशयातून गुरुवारी दुपारी १८ दरवाजे ०.५ फूट उचलून ९ हजार ४३२ क्युसेक पाण्याचा विसर्ग गोदावरी नदीच्या पात्रात सुरु करण्यात आला. या जलाशयात ९१.४७ टक्के एवढा पाणीसाठा उपलब्ध आहे. या जलाशयात पाणलोट क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे पाण्याची सतत होणारी आवक ओळखून पाटबंधारे खात्याने गोदावरीच्या पात्रात पाण्याचा विसर्गाचा निर्णय घेतला.

दरम्यान, येत्या काही तासात पाणी विसर्गाचे प्रमाण वाढविले जाण्याची शक्यता असून त्यामुळे गोदावरी नदीस पूर येईल, अशी चिन्हे आहेत. या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याचे निर्देश पाटबंधारे खात्याने जिल्हा प्रशासनामार्फत दिले आहेत.

### श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या जयंती महोत्सवानिमित्त रविवारी भरगच्च कार्यक्रम :

#### गुणवंतांचा, खेळाडूंचा गौरव : जिल्हास्तरीय स्केटींग स्पर्धा

**परभणी,/प्रतिनिधी :** दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सोनार समाजाचे आराध्यदैवत श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या जयंती निमित्ताने रविवार ३ ऑगस्ट रोजी महाअभिषेक, महापूजा या धार्मिक कार्यक्रमांसह अन्य भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती सोनार सेवा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत डहाळे यांनी दिली.

श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या मुर्तीवर रविवारी सकाळी ८ वाजता महाअभिषेक व महापूजेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तर सकाळी ११ वाजता जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली गुणवंत विद्यार्थी व खेळाडूंचा सत्कार सोहळा होणार आहे. या सोहळ्यास आमदार डॉ. राहुल पाटील, भाजपाच्या उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर, जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या नांदखेडा रस्त्यावरील मंदिराच्या सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे.

या व्यतिरिक्त जिल्हास्तरीय स्केटींग स्पर्धासुध्दा आयोजित करण्यात आल्या आहेत, अशी माहिती आयोजक चंद्रकांत डहाळे कार्याध्यक्ष रमेशराव शहाणे, जिल्हाध्यक्ष सुशील गवते, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. अंबीका डहाळे, दीपक बोकन, एकनाथ घोडके, गुरुप्रसाद टाक, दीपक टाक, नाना मैड, सूर्यकांत डहाळे, अनिल डहाळे, विलास कटके, अनिल पोतदार, रामू सेट शहाणे, एम.एम. टाक, विलास शहाणे, मनोज डहाळे आदींनी दिली.

### लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त १०५ फकीरा कादंबरीचे वितरण :

#### भाजपाच्या महानगर शाखेतर्फे उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त भारतीय जनता पार्टीच्य महानगर जिल्हा शाखेतर्फे नागरीकांना अण्णा भाऊ यांच्या फकीरा या कादंबरीच्या १०५ प्रती वितरित करण्यात आल्या.

शहरातील साठे यांच्या स्मारकासमोर पक्षाच्या वतीने शुक्रवारी (दि.०१) अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांनी साठे यांच्या प्रसिध्द फकीरा या कादंबरीच्या १०५ प्रती नागरीकांना वितरित केल्या. त्याद्वारे समाज प्रबोधन आणि साहित्य जागरातील साठे यांचे महत्वपूर्ण योगदान अधोरेखित करण्यात आले. यावेळी भालचंद्र गोरे, विजय दराडे, मधुसूदन जोशी, सुरज चोपडे आदी उपस्थित होते.

### स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीच्या दृष्टीने मोर्चेबांधणी सुरु

#### माजीमंत्री सुरेश वरपुडकर यांची माहिती : जिल्ह्यात समन्वयातून पक्ष कार्य

**परभणी,/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या दृष्टीने मोर्चेबांधणीस प्रारंभ करण्यात आला आहे, अशी माहिती ज्येष्ठ नेते माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांनी दिली.

भारतीय जनता पार्टीत प्रवेश केल्यानंतर वरपुडकर हे शुक्रवारी सकाळी परभणीत दाखल झाले. त्या पाठोपाठ भारतीय जनता पार्टीच्या स्थानिक पातळीवरील ज्येष्ठ नेते, ज्येष्ठ कार्यकर्ते यांच्या वरपुडकर यांनी सदिच्छा भेटी सुरु केल्या. माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलतांना वरपुडकर यांनी आपण शहरासह जिल्ह्यातील सामान्य कार्यकर्त्यांबरोबर संपर्क करुन हितगुज करणार आहोत. विशेषतः आगामी निवडणूकीच्या दृष्टीनेही व्युहरचना आखणार आहोत. पक्षाद्वारे दिलेल्या आदेशाप्रमाणे काम करणार असून ज्या ज्या ठिकाणी पक्षाची ताकद आहे. त्या ठिकाणी स्वबळावर किंवा ज्या ठिकाणी महायुतीतील मित्र पक्षाची ताकद आहे.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.
**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**
९४ २३३२४६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

### भारतीय जनता पार्टीची महानगर जिल्हा कार्यकारणी जाहीर

#### जम्बो कार्यकारणी : ५६ कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीची महानगर जिल्हा कार्यकारणी घोषित करण्यात आली असून या जम्बो कार्यकारणीत ५६ कार्यकर्त्यांना विविध पदांसह आघाड्यांच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांनी प्रस्तावित जिल्हा कार्यकारणी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना सादर केली. त्या पाठोपाठ प्रदेश पातळीवरुन कार्यकारणीस अधिकृत मान्यता मिळाल्यानंतर घोषणाही केली. ती कार्यकारणी पुढील प्रमाणे...महानगरअध्यक्ष शिवाजी भरोसे, उपाध्यक्ष मोकिंद खिल्लारे, ओंकार देशमुख, रितेश जैन, शेख निहाल, रुपाली ठाकरे, सुप्रिया मांडे, अक्षय डहाळे, उमेश शेळके, सरचिटणीसपदी ॲड. एन.डी. देशमुख, भालचंद्र गोरे, शंकर आजेगावकर, मंगल मुदगलकर, चिटणीसपदी विजय गायकवाड, अजिंक्य औंढेकर, आनंद वर्मा, मुकेश गाढे, बालिका सुरनर, सुकेशिनी चौधरी, उषा चव्हाण, डॉ. नम्रता पाटील, कोषाध्यक्षपदी ज्ञानेश्वर बोबडे, प्रसिध्दी प्रमुख गणेश रणेर, कार्यालयीन प्रमुख ओंकार दुधाटे, सोशल मिडीया प्रमुख माऊली कोपरे, महिला मोर्चा प्रमुख मनिषा जाधव, युवा मोर्चा प्रमुख अजिंक्य गौंढेस्वार, ओबीसी मोर्चा प्रमुख गणेश टाक, अल्पसंख्यांक मोर्चा प्रमुख हम्मु चाऊस, एसस्सी मोर्चा प्रमुख सुमीत भालेराव, एसटी मोर्चा प्रमुख ओम मुदीराज, किसान मोर्चा प्रमुख अच्युत रसाळ, अल्पसंख्यांक महिला मोर्चा प्रमुख छाया मोगले, ओबीसी महिला मोर्चा प्रमुख सुनीता घुगे, कायदा प्रकोष्ट प्रमुख ॲड. सुरेश शिंदे, प्रज्ञा प्रकोष्ट प्रमुख शिवाजी लोखंडे, वैद्यकीय प्रकोष्ट प्रमुख डॉ. मनोज पोरवाल, शिक्षण संस्थाचालक प्रकोष्ट प्रमुख लक्ष्मीकांत क्षीरसागर, शिक्षक प्रकोष्ट प्रमुख श्रीधर कोके, भटके विमुक्त प्रकोष्ट प्रमुख किसनसिंग टाक, अपंग विकास प्रकोष्ट प्रमुख रावसाहेब धरणे, ज्येष्ठ कार्यकर्ता प्रकोष्ट धनंजय बल्लाळ, झोपडपट्टी सेल प्रमुख महेंद्र धबाले, कामगार सेल प्रमुख एकनाथ चव्हाण, व्यापारी आघाडी प्रमुख सचिन अंबिलवादे, सहकार आघाडी प्रमुख नामदेवराव चव्हाण, उत्तर भारतीय आघाडी प्रमुख ऋषिसिंह ठाकूर, सांस्कृतिक आघाडी प्रमुख सोहम खिल्लारे, उद्योग आघाडी प्रमुख शंतनु सुभेदार, अध्यात्मिक आघाडी प्रमुख संजय ओझरकर, जैन प्रकोष्ट श्रीकांत आंभोरे, बेटी बचाओ बेटी पढाओ सेल प्रमुख नसरीन पठाण, माजी सैनिक आघाडी प्रमुख गंगाशंकर फुटाणे, पंचायतराज सेल प्रमुख भानुदास जवंजाळ, ट्रान्सपोर्ट सेल प्रमुख बंटी नवल, पदवीधर प्रकोष्ट मुकुंद वसंतराव चौधरी आदींच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.



**परभणी- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना परभणी शहर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी प्रा. रामेश्वर आवरगंड, शंकर भागवत, मा. नगर सेवक चांदुराम बोराडे, बबन मकासरे, सुरेंद्र रोडगे, विनोद कणकूटे, मनोहर गवारे, रामदास कदम, शेख इकबाल दावत, माही दांडगे आदी दिसत आहेत. छाया- शैलेश डहाळे, परभणी**

### सायकलस्वाराच्या मृत्यूनंतरही अतिक्रमणकर्ते वाहनांचा सुळसूळाट

**परभणी,/प्रतिनिधी-** येथील गंगाखेड नाक्यावर बुधवारी सायंकाळी पिकअप वाहनाने दिलेल्या धडकेत एका सायकलस्वाराचा मृत्यू झाल्यानंतरसुध्दा महापालिका व पोलिस प्रशासनाने या नाक्यावरील वाहतूकीच्या अभूतपूर्व कोंडीस कारणीभूत ठरणाऱ्या हातगाडेवाले, अतिक्रमणकर्ते व बेशिस्त वाहनांना हटविण्याचे सोयरसुतक दाखविले नाही.

गंगाखेड नाक्यावर बेसुमार अतिक्रमणे झाली आहेत. विशेषतः आसपासच्या विक्रेत्यांनी आपआपली दुकाने भर रस्त्यापर्यंत भिडविली आहेत. तर फळ व भाजी विक्रेत्या हातगाडेवाल्यांनी भर रस्त्यावर ठाण मांडले आहे. रस्त्याच्या दुतर्फाही विक्रेते रस्त्यावर बसून व्यवहार करीत आहेत. त्यातच रस्त्यावर वाहने उभी राहत असून त्यामुळे या भागात वाहतूकीची अभूतपूर्व कोंडी नित्याचीच झाली आहे. या पार्श्वभूमीवर सोपान मोरे नामक ५९ वर्षीय सायकलस्वाराचा पिकअप वाहनाने दिलेल्या धडकेत जागीच मृत्यू झाला. केवळ वाहतूकीच्या कोंडीमुळे या सायकलस्वाराचा मृत्यू होवूनसुध्दा महानगरपालिका व प्रशासनाने त्या भागातील या अतिक्रमणकर्त्यांना दुसऱ्या दिवशी हटविण्याचेही भान दाखविले नाही.

### खून प्रकरणातील फरार आरोपीचा मृतदेह आढळला;

**परभणी,/प्रतिनिधी :** मानवत येथील कोक्कर कॉलनीतील रहिवाशी ज्ञानेश्वर पवार यांच्या निर्घृण खून प्रकरणातील आरोपी मारोती चव्हाण यांचा शुक्रवारी (०१) दुपारी मानवत शिवारातील अंबेगाव नाका परिसरातील एका शेतातील विहिरीत मृतदेह आढळून आला.

सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप बोरकर, पोलिस उपनिरीक्षक प्रबोध देवकते यांच्यासह अन्य पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली असून त्या मृतदेहाची ओळख पटवून तो मृतदेह शवविच्छेदनाकरीता ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला आहे.

### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्याजयंती निमित्त अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी-** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त परभणी जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या आयोजित 'छत्रपती फुले शाहू आंबेडकर महोत्सव समिती' मार्फत अभिवादन करण्यात आले. कॉंग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



यावेळी सुहास पंडित, दिगंबर खरवडे, शजी अहमद खान यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. याप्रसंगी सुहास पंडित यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांवर भाष्य करताना सांगितले की, ''अण्णाभाऊ साठे हे दलित, श्रमिक आणि वंचित घटकांसाठी प्रेरणास्थान होते. त्यांच्या लेखणीने सामाजिक अन्यायाविरुद्ध जनजागृती केली. आजच्या काळात त्यांचे विचार अधिकच महत्त्वाचे झाले आहेत.''

कार्यक्रमाचे आयोजन साधेपणाने आणि उत्साहात पार पडले. छत्रपती शिवाजी महाराज,शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार या कार्यक्रमात घेण्यात आला.

## परभणीत स्थानिक निधी लेखा परिक्षा दिन उत्साहात साजरा

**परभणी,/प्रतिनिधी:** सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयात शासन निर्णयानुसार ''स्थानिक निधी लेखापरीक्षा दिन'' आज उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परभणी शहर महानगरपालिकाचे मुख्य लेखापरीक्षक श्रीरंग भुतडा तर प्रमुख पाहुणे म्हणुन मुख्य लेखा अधिकारी डॉ.प्रभाकर काळदाते, जिल्हा परिषद मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ.प्रकाश दासे, जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. दत्ता भांगे, सेवानिवृत्त सहायक संचालक साईजलंदर मुराडी हे होते. प्रास्ताविकात सहायक संचालक किरण




मदन कोल्हे यांनी स्थानिक निधी लेखा परीक्षा दिन साजरा करण्यामागची भूमिका विषद केली, तसेच स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाचे प्रशासकीय इमारत परिसरातील नवीन इमारतीत स्थलांतर होऊन नवीन जागेमध्ये कार्यालयाचे कामकाज सुरु झाल्याबाबत सर्वांना अवगत केले. श्रीरंग भुतडा यांनी लेखापरीक्षण करताना कोणत्या बाबींकडे लक्ष द्यावे, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वित्तीय अनियमितता होऊ नये म्हणुन लेखापरीक्षकाने दक्ष राहावे, असे प्रतिपादन केले. प्रमुख पाहुणे डॉ. प्रकाश दासे, डॉ. दत्ता भांगे व साईजलंदर मुराडी यांनीही मनोगत व्यक्त केले व सेवाकाळातील आपले अनुभव कथन केले. कार्यक्रमाला स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, जिल्हा कोषागार कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी, तसेच परभणी जिल्ह्यातील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सर्व राजपत्रित अधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी मान्यवरांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

सूत्रसंचलन श्रीकांत पांचाळ यांनी तर आभार प्रदर्शन किशोर पाईकराव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहायक लेखापरीक्षा अधिकारी दिलीप बेराड, जयसिंग सानप, दिपक भुसवर, वरिष्ठ लेखापरीक्षक राम चव्हाण, विकास माळी, कनिष्ठ लेखापरीक्षक संदिप कपाळे, सचिन ढेंबरे, संजय मुराडी, शिपाई शिवाजी जाधव, विनायक अवचार, सचिन अवचार यांनी विशेष परीश्रम घेतले.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर जिल्ह्यातील सर्पमित्रांना स्नेक रेस्क्यू किटचे वितरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** एलटीएनच्या चौथा वर्धापन दिनानिमित्त वर्धापन दिन विशेषांक व सर्प मित्रांना स्नेक रेस्क्यू किटचे दिनांक सकाळी १० वाजता डॉ अण्णाभाऊ साठे चौक गंजगोलाई लातूर येथे वनपरिक्षेत्र अधिकारी धनंजय पोटे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर व गणेश चौधरी केंद्रीय अधिकारी अग्निशमन दल मनपा लातूर यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

सर्पमित्र शासनाच्या कोणत्याही मानधनाशिवाय अथवा कोणत्याही देणगीशिवाय साप पकडण्याचे जोखीमीचे काम करत असतात गेली अनेक वर्षापासून सर्प मित्रांच्या विविध मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत त्यावर शासन गांभीर्याने विचार करणे गरजेचे असताना त्याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. ही बाब विचारात घेऊन सर्पमित्र विकास संघटनचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा एलटीएनचे संपादक नेताजी जाधव यांनी दुसऱ्या वर्धापन दिनी राज्यस्तरीय सर्पमित्र संमेलन व चौथ्या वर्धापन दिनानिमित्त जिल्ह्यातील ३० सर्पमित्रांना स्नेक रेस्क्यू किटचे वाटप करण्याचा संकल्प आज पूर्ण केला आहे.

या कार्यक्रमासाठी स्वामी विवेकानंद पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील, मोटार वाहन निरीक्षक सुरेश माळी प्रादेशिक परिवहन कार्यालय लातूर, वन परिमंडळ अधिकारी निलेश बिराजदार, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरसिंह घोणे यांचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वनपरिक्षेत्र अधिकारी धनंजय पोटे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून धनंजय पोटे बोलताना त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



### संक्षिप्त वृत्त...

## लिनेस क्लबकडून विरंगुळा केंद्रास सिमेंटचे बाकडे भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** ऑल इंडिया लिनेस डिस्ट्रिक्ट एमएच-५ हिरकणी अंतर्गत लातूर लिनेस



क्लबने आपले सामाजिक कार्य वेगाने सुरू ठेवले आहे.समाजातील वंचित घटकांना न्याय देण्याच्या व्यापक कार्याचा एक भाग म्हणून, क्लबने औसा रोड येथील क्रीडा संकुल परिसरातील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राला सिमेंट बाकड्यांची भेट दिली.

क्लबच्या माजी प्रांताध्यक्षा प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांच्या हस्ते बाकडे प्रदान करण्यात आली. यावेळी लिनेस क्लबच्या प्रांताध्यक्षा साधना पळसकर, रिजन चेअरपर्सन कौशल्या खोसे, मंगल घाडगे, डॉ. उल्का देशमुख, कौशल्या जाधव, सुवर्णा महाजन, ज्योती मंठाळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिव प्रकाश घादगिने यांनी केले. आभार प्रकाश निला यांनी यांनी मानले.

## खुन केल्या प्रकरणी दोघांना जन्मठेप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** अनैतिक संबंधाच्या संशयावरून सख्खा चुलत भाऊ व एक नातेवाईक यांनी घरात घुसून अंगा -खांद्यावर चाकूचे वार करून खून केल्याप्रकरणी बालाजी सुभाष राठोड (रा. शिंदाळवाडी तांडा, ता. औसा) व हर्ष त्र्यंबक चव्हाण (रा. तळणी तांडा, ता. औसा) या दोघांना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेप व ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

या दोघांनी १२ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रदीप पापाजी राठोड (रा. शिंदाळावाडी तांडा) यांच्या घरात घुसून त्यांचा खून केला होता. प्रदीप हा बालाजी राठोड याचा सख्खा चुलत भाऊ आहे. या प्रकरणात भादा पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कवाळे यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. या प्रकरणी विशेष सरकारी अभियोक्ता एस. व्ही. देशपांडे यांनी बाजू मांडली. या प्रकरणात महिला पोलीस कर्मचारी पी. डी. कोरे यांनी पैरवी केली.

## अवैध दारु विक्री; ८४ गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस दलाने जिल्ह्यातील देशी-विदेशी दारूची अवैध विक्री संबंधाने मास रेड करून ८४ गुन्हे दाखल करत २ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जिल्ह्यातून अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात मास रेड करून दारूचे रसायन नष्ट करण्यात आले.

## मोहसीन खान यांना मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** विविध सामाजिक प्रश्नांवर अनोखे आंदोलने करीत प्रशासनाचे तर कधी सरकारचे लक्ष वेधणारे स्वाभिमानी मुस्लिम विकास परिषदेचे अध्यक्ष मोहसीन खान यांना नॅशनल कॉन्फरन्स ऑफ मायनॉरिटीच्या वतीने अबुल कलाम आझाद समाजसेवी राष्ट्रीय पुरस्कार नुकताच जाहीर झाला असून तो दिल्ली येथील कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया येथे दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे. तेलंगाना, महाराष्ट्र, बिहार, कर्नाटका आदी राज्यात सामाजिक क्षेत्रात काम उल्लेखनीय करणाऱ्यांना हा पुरस्कार दरवर्षी नॅशनल कॉन्फरन्स ऑफ मायनॉरिटीच्या वतीने देण्यात येतो. यावर्षीचा हा पुरस्कार महाराष्ट्रातील अल्पसंख्यांक, दलित, पीडित, शोषितांच्या प्रश्नावर सतत आवाज उठविणारे कार्यकर्ते मोहसीन खान यांना जाहीर झाला आहे. या पुरस्काराबद्दल मित्रपरिवारातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# सकारात्मक पत्रकारितेतून समाजहित जपा : पोलीस अधीक्षक तांबे



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** वस्तूनिष्ठ मांडणी, विधायक लिखाण व प्रश्नावर उपाय सूचविणे लक्षात ठेऊन सकारात्मक पत्रकारिता केली तरच समाजहित साध्य होते, अन्यथा नकारात्मक पत्रकारितेतून प्रगतीचा वेग मंदावतो, असे मत पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी व्यक्त केले.

माहिती जनसंपर्क विभाग, माहिती उपसंचालक व जिल्हा माहिती कार्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी लातूर जिल्ह्यातील पत्रकारांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे येथील डॉ. भालचंद्र सभागृहात आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी माहिती व जनसंपर्क विभागाचे लातूरचे उपसंचालक विवेक खडसे हे होते. यावेळी मार्गदर्शक प्रा. दीपक रंगारी, जिल्हा सूचना अधिकारी पुरुषोत्तम रुकमे, सहसंचालक डॉ. श्याम टरके, जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी बाळशास्त्री जांभेकर, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे, लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्ज्वलन करण्यात आले.

यावेळी पोलीस अधीक्षक तांबे म्हणाले, पत्रकारिता ही नेहमी सकारात्मक असावी, पत्रकारिता वास्तव, शोध व उपाय सूचविणारी असावी. वास्तविक पोलीस हे एक समाजातील छोटे अंग आहे. पण, आजकाल ७० ते ८० टक्के पत्रकारिता ही पोलिसांभोवतीच गुरफटलेली दिसत आहे. पत्रकारिता ही समतोल असली पाहिजे. चुकीच्या आणि असत्य बातमीने मन उदासीन होते. मी विद्यार्थी दशेत असताना माझे पालक मला भाषा, माहिती, मार्गदर्शनासाठी अमूक हे वृत्तपत्र वाच असे सांगायचे. तसेच टी. व्ही. वरील अमूक चॅनल पाहा, असे सांगायचे. पण, आज मी माझ्या मुलांना ज्ञान वाढीसाठी, शुध्दलेखनासाठी, माहितीसाठी अमूक अमूक हे वृत्तपत्र वाच किंवा हे चॅनल पाहा हे सांगू शकत नाही. हा माझ्यासमोरचा मोठा प्रश्न आहे.

आजची पत्रकारिता ही आत्मपरीक्षण करण्याच्या स्थितीत आहे, असे मतही त्यांनी व्यक्त केले. पत्रकारिता, पत्रकारितेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पत्रकारितेत शुध्दलेखनाचे महत्त्व किती आहे हे त्यांनी आलेल्या अनुभवावरून सिध्द करून दाखविले. पत्रकारितेत महिलांचा अभाव याबाबत पोलीस अधीक्षक तांबे यांनी चिंता व्यक्त केली.

या कार्यशाळेस 'वृत्त संकलन संपादनात शुध्दलेखनाचे महत्त्व' या विषयावर मराठी भाषातज्ज्ञ प्रा. रंगारी तसेच 'कृत्रीम बुध्दिमत्ता आणि पत्रकारिता' या विषयावर जिल्हा सूचना अधिकारी रुकमे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात माहिती उपसंचालक खडसे यांनी पत्रकारितेला यापुढे एआय तंत्रज्ञानाचा वापर करून घेणे आवश्यक ठरले आहे. पत्रकारितेत समाज जागृतीला अधिक महत्त्व आहे. पत्रकारांनी आपल्या व्यवसायासंबंधी विश्वासार्हता टिकवून ठेवणे हे आज आव्हान ठरत आहे, असे नमूद केले. सूत्रसंचालन उध्दव फड यांनी केले. रेखा पालवे-गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यशाळेस जिल्हाभरातील पत्रकार सहभागी होते.

# सेवालय बालगृहातील मुलांचे स्थलांतर तत्काळ थांबवा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** औसा तालुक्यातील हासेगाव येथील सेवालयातील मुलांना दुसऱ्या बालगृहात हलविण्याचा डाव जिल्हा महिला बालविकास अधिकारी कार्यालयाच्यावतीने सुरू आहे. सेवालयातच एचआयव्ही संक्रमित अनाथ मुलांचे भवितव्य उज्ज्वल आहे. त्या मुलांना कुठेही हलवू नये, अशी मागणी येथील रणरागिणी कला पथक व सेवाभावी संस्थेच्यावतीने जिल्हा महिला बालविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. बालकांना हलविल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.




एचआयव्ही/एड्स संक्रमित महिला व त्यांच्या पाल्यांचे सुदृढ आरोग्य व उज्ज्वल भवितव्यासाठी मागील १५ वर्षांपासून सेवालय काम करीत आहे. आम्ही सेवक संस्थेच्यावतीने चालविण्यात येणारे सेवालय बालगृह व हॅप्पी इंडियन व्हिलेजच्या माध्यमातून तेथे एचआयव्ही संक्रमित अनाथ मुलांचा व सज्ञान झालेल्या मुला-मुलींचा व्यवस्थित सांभाळ केला जातो. अनेक कुटुंब स्वावलंबी होऊन स्वतःचे संसार सुखाने थाटत आहेत. एचआयव्ही संक्रमित दाम्पत्यांना निगेटिव्ह मुले झाली आहेत. सर्व सुरळीत सुरू असताना सेवालयातील एका बालिकेला फूस लावून सेवालयविरोधातील विघ्नसंतोषी मंडळींनी गालबोट लावण्याचा प्रयत्न केला आहे. सेवालयाचे प्रमुख रवी बापटले यांचे काम संपूर्ण जगाला माहित आहे. त्यांना बदनाम करण्यासाठी हे गुन्ह्याचे कुभांड रचण्यात येत आहे. वारंवार त्यांना अडचणीत आणण्याचा खोटा प्रयत्न झाल्याचे निदर्शनास आले आहे.

या गुन्ह्यातही काही तथ्य नाही, हे लवकरच न्यायालयात सिध्द होईल. परंतु, केवळ रवी बापटले यांच्यावर गुन्हा दाखल झाला म्हणून येथील बालकांना दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्याचा विचार आपल्या मनात आलाच कसा? सेवालयातील सर्व बालके सुखात आहेत. त्यांना नियतिपणे आरोग्य, शिक्षण, सकस भोजन, क्रीडा या मूलभूत सुविधा मिळत आहेत. तरीही या लेकरांना दुसऱ्या बालगृहात हलविण्याचा घाट घालण्याचा प्रयत्न केला तर रणरागिणी कला पथक व सेवाभावी संस्थेच्यावतीने तुमच्या या निर्णयाचा कठोर विरोध करण्यात येईल. शासनाने मुलांना स्थलांतरीत करण्याचा निर्णय घेतला तर या मुलांच्या जीविताला काही झाले तर त्याची जबाबदारी आपल्या कार्यालयावर राहील, असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सदर निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महिला व बालकल्याण मंत्री, पालकमंत्री, जिल्हाधिकारी यांनाही सादर करण्यात आले आहे. या निवेदनावर संस्थेच्या अध्यक्षा कांचन वाघमारे यांच्यासह इतर पदाधिकारी आणि विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मराठा समाजाची रविवारी बैठक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे उपोषण करून मराठा आरक्षणाचा लढा देणारे मनोज जरांगे पाटील आता पुन्हा एकदा मुंबईच्या दिशेने उपोषणासाठी निघणार आहेत. येत्या २९ ऑगस्ट रोजी ते मुंबईकडे प्रस्थान करतील. या लढ्यात संपूर्ण मराठा समाजाने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

याच आवाहनाला प्रतिसाद देत, मराठा समाजाच्या वतीने मुंबईतील उपोषणाची तयारी करण्यासाठी लातुरात जिल्हा बैठकीचे आयोजन केले आहे. ही बैठक रविवार, ३ ऑगस्ट रोजी रुक्मिणी मंगल कार्यालय, रिंग रोड येथे दुपारी १२ वाजता होईल. यात उपोषणासंदर्भात पुढील रणनीतीवर चर्चा केली जाणार असल्याचे संयोजकांच्यावतीने सांगण्यात आले.

# अण्णा भाऊ साठे व लोकमान्य टिळकांना ठिकठिकाणी अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवारी जिल्हाभरातील विविध शासकीय-निमशासकीय कार्यालये, विविध पक्ष, संघटना, शाळा, महाविद्यालयांमध्ये प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

### धीरज देशमुख यांचे अभिवादन

थोर साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०५व्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती महोत्सव समितीतर्फे आयोजित अभिवादन कार्यक्रमप्रसंगी माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष धीरज देशमुख यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, शहराध्यक्ष किरण जाधव, संतोष देशमुख, डॉ. दिनेश नवगिरे, कैलास कांबळे, जीवन सुरवसे, अॅड. प्रवीण पाटील, मोहन माने, गोपाळ बुरबुरे, आतिष चिकटे, चंद्रकांत चिकटे, मोहन सुरवसे, प्रवीण सूर्यवंशी, अॅड. समद पटेल आदी यांच्यासह सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### दयानंद विज्ञान महाविद्यालय

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात प्र. प्राचार्य डॉ. सिध्देश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे, कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे, सिनेट सदस्य डॉ. महेश बेंबडे, डॉ. विजेंद्र चौधरी, प्रा. बळवंत सूर्यवंशी, प्रा. शिवाजी आळणे, ग्रंथपाल प्रा. किरण भिसे, प्रा. विजयकुमार मांदळे, प्रा. वैभव कुलकर्णी, प्रा. आशा बोराडे, विनोद घार, विष्णू नाईकवाडे, सतीश तांदळे, किशोर जाधव, सुदाम सातपुते, धीरज पारिख, रजनीकांत मदने, वशिष्ठ कुलकर्णी, श्रावण माळी, सागर इंदानी, पूजा सूर्यवंशी, सुदर्शन काळे, अर्चना शर्मा आदी उपस्थित होते.

### राजमाता जिजामाता संकुल

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रारंभी संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, करिष्मा केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### केशवराज विद्यालय

येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, लातूर शहराचे बौध्दिक प्रमुख श्रीनिवास जोशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी, रेणुका गिरी, शैला कुलकर्णी, तेजस्विनी सांजेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जोशी व मुख्याध्यापक केंद्रे यांनी मार्गदर्शन केले. संगीत शिक्षक संतोष बीडकर व त्यांच्या चमूने पोवाडा सादर केला. अश्विनी स्वामी यांनी सूत्रसंचालन करून शेवटी आभार मानले.

### सार्वजनिक जयंती उत्सव समिती

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे, विनय जाकते, अभिषेक पतंगे, आकाश सरवदे, सिध्दांत चिकटे, राहुल कांबळे, वैभव गायकवाड, रितेश गायकवाड, स्वप्निल कांबळे, लक्ष्मण अंकुशे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

### शहर भाजप

शहर भाजपच्यावतीने अदिती पाटील कव्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत जयंतीनिमित्त अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी माजी शहराध्यक्ष गुरुनाथ मगे, माजी सभापती अॅड. शैलेश गोजमगुंडे, सरचिटणीस रवी सुडे, अॅड. दिग्विजय काथवटे, मीना भोसले, मंगेश बिराजदार, शोभा पाटील शिवसिंह सिसोदिया आदी उपस्थित होते.

### आमदार कराडांकडून अभिवादन

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भाजपचे नेते आमदार रमेश कराड यांनी या दोन्ही थोर महापुरुषांना पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

येथील भाजपच्या 'संवाद' कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास विक्रम शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, नवनाथ भोसले, महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, सतीश अंबेकर, बाबासाहेब घुले, पद्माकर चिंचोलकर, अनंत चव्हाण, दशरथ सरवदे, पांडुरंग बालवाड, रुपेश काळे आदी उपस्थित होते.







## आपल्या भागाचा विकास हाच आमचा दृष्टिकोन : धिरज देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ ऑगस्ट -** राजकारण व समाजकारणात काम करत असताना आपल्या भागाचा सर्वांगीण विकास हाच आमचा दृष्टिकोन कायम असल्याचे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांनी केले.

लातूर तालुक्यातील बोरगाव काळे येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या वतीने सतीश काळे व त्यांच्या सहकारी सदस्यांनी १५०० केसर आंबा झाडे वाटप, शेतकरी महिला मेळावा व सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल धिरज विलासराव देशमुख यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी रीड लातूरच्या संस्थापक सौ.दीपशिखा धिरज देशमुख,कु.दिवियाना देशमुख,चि. वंश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाजार समिती सभापती जगदीश बावणे, मांजरा कारखाना व्हा चेअरमन अशोकराव काळे, माजी जी.प.सदस्य धनंजय देशमुख, माजी जी.प.अध्यक्ष संतोष देशमुख, २१ शुगरचे विजय देशमुख,माजी व्हा चेअरमन रवी काळे, तालुका काँग्रेस अध्यक्ष सुभाष घोडके,जिल्हा बँक संचालिका स्वयंप्रभा पाटील, सपना किसवे, राजकुमार पाटील, कैलास पाटील, लक्ष्मण पाटील, तुकाराम पाटील, श्रीकृष्ण काळे, रणजीत पाटील, अनंत बारबोले, तात्या पालकर, अनिल पाटील, नवनाथ काळे, मदन भिसे, लतिका देशमुख आदिंची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माजलगाव सहदुय्यम निबंधक कार्यालयात महसूल दिन उत्साहात साजरा

### शेतकऱ्यांचा व नागरिकांचा सत्कार, महिलांना मुद्रांक शुल्क सवलतीचा लाभ

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ ऑगस्ट**

महसूल दिनानिमित्त दिनांक १ ऑगस्ट शुक्रवार रोजी माजलगाव येथील सहदुय्यम निबंधक कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून तो उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी दस्त नोंदणीसाठी आलेल्या नागरिकांचे पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले आणि त्यांच्या योगदानाची दखल घेण्यात आली.

या कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरले, ते म्हणजे सलोखा योजना अंतर्गत दस्त नोंदणी करणाऱ्या मौजे नाखलगाव येथील शेतकऱ्यांचा सन्मान. त्यांनी या योजनेंतर्गत लाभ घेतले असून त्यांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी, निवासी सदनिका, फ्लॅट आणि बंगला खरेदीसाठी १ टक्के मुद्रांक शुल्क सवलतीच्या दरात दस्त नोंदणी करण्यात आली. या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांचे विशेष कौतुक करण्यात आले, जे महिलांच्या आर्थिक सबलीकरणाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे.या खास दिनाचे औचित्य साधून कार्यालयाची फुलांनी व फुग्यांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. रंगीबेरंगी रांगोळीने परिसर अधिकच सुंदर व स्वागतार्ह वाटत होता.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये प्रभारी सहदुय्यम निबंधक जी.के.चौधरी, कनिष्ठ लिपिक व्ही.जी.मुनेश्वर, संगणक ऑपरेटर नामदेव लटपटे व सिद्धेश्वर बोबडे यांचा मोलाचा सहभाग होता. त्यांनी मिळून कार्यालयाच्या सजावटीपासून ते कार्यक्रमाच्या सुयोग्य नियोजनापर्यंत सर्व बाजूंनी सक्रिय भूमिका बजावली.महसूल विभागाचा हा उपक्रम लोकाभिमुख प्रशासनाची जाणीव करून देणारा ठरला असून नागरिकांमध्ये सकारात्मक प्रतिसाद पाहायला मिळाला.

# चोरी गेलेले २५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन फिर्यादीस परत पोलिसाच्या कामावर समाधान

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२ ऑगस्ट**

पोलीस ठाणे परळी येथे दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी हलगे गार्डन या ठिकाणी शिव महाकथेची आयोजन करण्यात आले होते, त्यादरम्यान महाप्रसादाकरिता फिर्यादी महिला व इतर महिला अशा महाप्रसादासाठी असताना त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन/ मंगळसूत्र असे चोरी झाली होती, त्यावरून पोलीस ठाणे परळी शहर येथे गुरन १७६/ २४ प्रमाणे दाखल होता, सदर गुण्याचा तपास करून यातील आरोपी महिला यांचा बीड व धाराशिव येथे शोध घेऊन गुन्ह्याततील आरोपी महिला यांना गुन्ह्यात अटक करून चोरलेले मनी मंगळसूत्र व सोन्याची चैन असे गुन्ह्यात जप्त करून गुन्हा तपास करून कोर्टात दाखल करण्यात आला होता.

आज रोजी सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली चैन व मनी मंगळसूत्र असे यातील फिर्यादी महिला नामे कमलाबाई मोतीलाल बांगड राहणार परळी यांचा मुलगा नामे मनोज कुमार मोतीलाल बांगड यांना एक चैन रुपये २,५०,०००/ किमतीची २५ ग्राम वजनाची परत करण्यात आली आहे. त्यावरून फिर्यादी व त्यांचे कुटुंबीय यांनी पोलिसाच्या कामावर समाधान व्यक्त केले आहे.

सदरची कारवाई पो नि. आर के नाचण यांच्या अधिपत्याखाली पोहे गोविंद भताने पोहे घटमळ पो ना/ पांचाळ यांनी केली आहे.

# १८ कॅरेट सोन्यातील 'मंगळसूत्र महोत्सव'चे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ ऑगस्ट**

महाराष्ट्रातील घराघरांमध्ये परंपरेसह, विश्वासाने घेतले जाणारे नाव, पीएनजी ज्वेलर्स यांचा प्रतिष्ठित आणि




बहुप्रतीक्षित 'मंगळसूत्र महोत्सव' यंदा २१व्या वर्षात पदार्पण करत आहे. विवाहसंस्थेचे पावित्र्य आणि स्त्रीच्या सौंदर्याचे प्रतीक असलेले मंगळसूत्र, या महोत्सवात नव्या स्वरूपात अनुभवता येणार आहे. या वर्षी पहिल्यांदाच १८ कॅरेट सोन्यातील मंगळसूत्रे पीएनजी ज्वेलर्सने ग्राहकांसाठी उपलब्ध केली आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मंगळसूत्र महोत्सवात पारंपरिकता आणि आधुनिकतेचा सुंदर संगम पाहायला मिळणार आहे. ७ वेगवेगळ्या प्रकारांत – पारंपरिक, आधुनिक, हलक्या वजनाचे, ऐतिहासिक, पोल्की, हिरे आणि गोकाक यांचे २००० हून अधिक डिझाइन्स महाराष्ट्र आणि गोव्यातील पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व शाखांमध्ये सादर करण्यात येणार आहेत.

मंगळसूत्र महोत्सवानिमित्त ग्राहकांना सोन्याच्या मंगळसूत्राच्या घडणावळीवर ५० टक्के पर्यंत सवलत आणि हिऱ्यांच्या मंगळसूत्राच्या घडणावळीवर १०० टक्के पर्यंत सवलत मिळणार आहे. त्यामुळे मंगळसूत्र खरेदीसाठी ही एक सुवर्णसंधी आहे.पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, २१ वर्षांचा हा प्रवास आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा आहे. यावर्षी प्रथमच आम्ही १८ कॅरेट सोन्याचे मंगळसूत्र बाजारात आणत आहोत. जे आजच्या काळातील स्मार्ट आणि स्टायलिश महिलांसाठी खास आहे. परंपरा आणि आधुनिकता यांचा संगम असलेल्या या महोत्सवातून प्रत्येक स्त्रीचे व्यक्तिमत्त्व, तिची स्टाईल आणि मूल्य यांचा सन्मान करत आम्ही विश्वासार्हतेची आणि उत्कृष्ट कारागिरीची परंपरा जपत राहू. हा महोत्सव म्हणजे पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड देणारा एक अद्वितीय उपक्रम आहे. जिथे सौंदर्य, गुणवत्ता आणि संस्कृती यांचे दर्शन घडते.

# श्री क्षेत्र रामतीर्थ मठ येथे श्रावण मासा निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजित

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ ऑगस्ट**

श्री क्षेत्र दादा महाराज खडकीकर रामतीर्थ मठात, श्रावण महिन्यातील दैनंदिन कार्यक्रम खालील प्रमाणे ,सकाळी महादेव मुर्ती स अभिषेक ,७ ते ८,होमहवन नवग्रह व उमाम्हहेश्वर नामनावली ,९ते १२,नंतर आरती ,विध्यागुरू महाराज खडकीकर यांच्या मार्गदर्शना खली ,कार्यक्रम संपन्न होत आहे ,दिंनाक २ ,७,२५, पासून शिवपुराण कथा आयोजित केली आहे ,दिंनाक ८ ,७,२५, रोज सांगता ,कथाकार श्री योगेश महाराज गेवराई कर यांच्या रसाळ वाणितुन श्रवण करणार आहोत , कथचे आयोजन परीसरातील सर्व महिला मंडळ आहेत ,तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी कथेला उपस्थित राहवे ,आठ तारखेला महाप्रसाद होईल, सगळ्याच्या वतीने ,आसे आहवान मठाधिपती विध्यागुरू महाराज खडकीकर यांनी केले आहे. सौ रोहिणी खडकीकर ,सौ राजेश्री सारडा ,सौ मालु भाभी ,सौ आंजली चरखा ,सौ झंवर भाभी ,सौ टकले ,दळवी ,उषा जगताप ,आदी महिला




# जिल्हाभरात 'हरित बीड अभियान' जोरावर ! ७ ऑगस्ट रोजी उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते खंडेश्वरी देवी परिसरात होणार वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ ऑगस्ट**

पर्यावरण रक्षण व हरितक्रांतीचा संदेश देणाऱ्या ' हरित बीड अभियानां 'तर्गत जिल्ह्यातील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे . येत्या ७ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते खंडेश्वरी देवी मंदिर परिसरात वृक्षारोपण होणार आहे .




या अभियानाचा मुख्य उद्देश एक दिवसात ३० लाख वृक्षारोपणाचा संकल्प असून , या महत्वाकांक्षी उपक्रमासाठी जिल्हा प्रशासन , विविध विभाग , शाळा , महाविद्यालये , स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचे सक्रिय योगदान अपेक्षित आहे .

या उपक्रमासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान , रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी प्रबोधय मुळे , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि अन्य सर्व विभागांचे अधिकारी–कर्मचारी सज्ज आणि कटिबद्ध आहेत . त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात एक ऑगस्ट रोजी सायंकाळी सर्व विभाग प्रमुख यांची जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठक घेतली . बैठकीस जिल्हा कृषी अधिकारी , सर्व तालुका कृषी अधिकारी , सर्व गटविकास अधिकारी , सर्व मुख्याधिकारी , सर्व तहसीलदार उपस्थित होते .

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की बीड जिल्हा हा तसा ओरडवाहू जिल्हा आहे . पावसाचे प्रमाण कमी आहे . जंगलाचे प्रमाण अत्यल्प आहे . अशा परिस्थितीत झाडे लावणे आणि झाडे जगवणे ही प्रत्येकाची प्राथमिक जबाबदारी ठरते . प्रत्येक विभागाने झाडे लागवडीचे नियोजन करावे. रोपे कुठून आणावीत , कशा पद्धतीने ती पोहोच करावीत , रोपे लावण्यासाठी खड्डे करण्याचे नियोजन कसे करावे , तसेच प्रत्येक रोप लावल्यानंतर क्यू आर कोड द्वारे कशाप्रकारे रजिस्ट्रेशन करावे याबाबत त्यांनी सविस्तर सूचना दिल्या . यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान यांनी सर्व गटविकास अधिकारी यांनी ग्राम पातळीवर विस्तार अधिकारी , ग्रामपंचायत अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे . तसेच पुढील कालावधीत खड्डे खोदणे आणि रोपे पोहोच करणे इत्यादी कामे करून घेणार असल्याचे नमूद केले .या अभियानाची एक विशेषता म्हणजे एक पेड माँ के नाम हा भावनिक आणि सामाजिक संदेश . पर्यावरणाचे रक्षण करताना आपल्या मातेच्या स्मृतीस वंदन करणारा हा संकल्प विद्यार्थी व नागरिकांमध्ये चांगलाच रुजतो आहे .

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वीरित्या राबविता येईल यासाठी त्यांची सर्व यंत्रणा कार्यान्वित केली आहे . स्वतः त्यांनी पालवन येथील वनविभागाच्या जागेस गुरुवारी भेट दिली . तेथे सुरू असलेल्या खड्डे खोदण्याच्या कामाची पाहणी केली यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी देविदास गाडेकर व त्यांचे सहकारी उपस्थित होते . देविदास गाडेकर यांनी नमूद केले की आम्ही येथे रोपे आणून सात तारखेला वृक्षारोपण करणार आहोत.

बीड जिल्ह्याच्या विविध भागांमध्ये हजारो ठिकाणी वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यात येणार असून , त्यासाठी नियोजन , जागा निवड , रोपांची उपलब्धता आणि जनजागृती यावर भर देण्यात आला आहे.हरित बीड अभियान २०२५ हे केवळ वृक्षारोपणापुरते मर्यादित नसून , ते जिल्ह्याच्या दीर्घकालीन हरित विकासाचा पाया ठरणार आहे . पर्यावरण संवर्धनाची ही चळवळ लोकसहभागातून यशस्वी करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात विस्तार सेवा कार्य अंतर्गत आरोग्य तपासणी

### आरोग्य म्हणजे केवळ रोग नसणे, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या उत्तम स्थिती असणे होय –डॉ. अमोल जाधव

**तभा वृत्तसेवा**
**अंबड दि.२ ऑगस्ट**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालय सतत विद्यार्थ्यांच्या आरोग्य संदर्भात काळजी घेत असते. देशाचे भावी नागरिक हे सुदृढ व आरोग्य संपन्न व्हावे याचा उपयोग त्यांना शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी होत असतो.



कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयांमध्ये विस्तारसेवा कार्य समिती व उपजिल्हा रुग्णालय अंबड यांच्या संयुक्त विद्यमानाने विद्यालयातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी संपन्न झाली.

या आरोग्य तपासणी मध्ये डॉ. अमोल जाधव, डॉ. कीर्तीजा तरटे सहकारी फार्मासिस्ट छाया काकडे, सविता साबळे विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप जोशी विस्तार सेवा कार्यप्रमुख राधेश्याम धोकटे, विभाग प्रमुख रागिनी जोशी, मारुती झाटे, स्नेहलता खानापूरकर ताई उपस्थित होते.

विद्यालयामध्ये उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी इ १ ते ७ वी विभागातील ४०० विद्यार्थ्यांची सखोल आरोग्य तपासणी केली यावेळी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले. यावेळी वैद्यकीय अधिकारी अमोल जाधव व कीर्तीजा तरटे

म्हणाले की आरोग्य ही एक व्यापक संकल्पना आहे, ज्यात शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य, आणि सामाजिक संबंधांचा समावेश होतो. चांगले आरोग्य विद्यार्थ्यांच्या दैनंदिन कामाला सक्षम बनवते आणि जीवनाचा दर्जा सुधारते. सर्व विद्यार्थ्यांनी सकस आहार घ्यावा. बाजारातील पॅकिंगचे पदार्थ खाणे टाळावे. विद्यार्थ्यांनी सकस आहार घेऊन आरोग्य संपन्न जीवन जगावे असा मोलाचा संदेश दिला. या आरोग्य तपासणीची सांगता कल्याणमंत्र्यांने करण्यात आली

# समाजाला दिशा देण्याचे काम अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या विचारांनी केले–प्रा.दीपक देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ ऑगस्ट**

स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांची पूण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या दोन महात्म्यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख वक्ते प्रा. दीपक देशमुख यांनी सांगितले की, अण्णाभाऊ साठे यांनी शोषित वंचित समाजाचा आवाज होऊन समाजाच्या प्रवाहात त्यांना आणण्यासाठी प्रयत्न केले. तर लोकमान्य टिळकांनी आपल्या विचारांनी गुलामगिरीच्या झोपेत असलेल्या लोकांना जागृत करण्याचे काम केले.

या महान लोकांसाठी कृतज्ञता म्हणून आपण स्वदेशी वस्तूंचा वापर जास्तीत जास्त करावा हिच खरी आदरांजली त्यांना होईल असे प्रतिपादन प्रा. देशमुख यांनी केले.

अध्यक्षीय समारोप करताना मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे यांनी अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांचे विचार समाजात रुजविण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन समोर आले पाहिजे. केवळ जयंती साजरी न करता त्यांचे कार्य अंमलात आणावे असे प्रतिपादन काळे यांनी केले. यावेळी अण्णाभाऊ साठे यांनी रचलेले माझी मैना गावाकडे हे सुंदर गीत इयत्ता नववीच्या विद्यार्थीनींनी गायले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. भक्ती गोळवलकर हिने तर सूत्रसंचालन कु. आर्या खोले या विद्यार्थीनीने केले. आभार प्रदर्शन कु. कादंबरी आगळे हिने केले.यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री . विठ्ठल काळे, विद्यासभा उपाध्यक्ष व पर्यवेक्षक श्री उमेश जगताप, उपमुख्याध्यापक श्री संदीप देशमुख, प्रमुख वक्ते प्रा. दीपक देशमुख, अभ्यास पूरक प्रमुख सौ सुलक्षणा खणके हे उपस्थित होते.



# साठे यांची जयंती व टिळक पुण्यतिथी नानाजी देशमुख विद्या मंदिरमध्ये साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ ऑगस्ट**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख विद्या मंदिर बीड यांच्या विद्यमाने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी विद्यार्थ्यांनी साजरी केली. सर्वप्रथम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन केले. त्यांच्या जीवनातील कार्य किती महत्त्वाचे आणि मोलाचे होते याची सर्वांना ओळख पटावी आणि विद्यार्थ्यांमध्ये त्याचा प्रभाव रुजावा हा उद्देश. त्यामध्ये मयुरेश शिंदे या विद्यार्थ्याने सूत्रसंचालन केले. प्रमुख पाहुणे उपेंद्र लांडे व अध्यक्ष म्हणून मयुरेश गुळवे यांनी स्थान स्वीकारले होते. त्यामध्ये धीरज वाघमारे, सई सावरे, पूजा घुमरे, साची पवार, श्री बिक्कड , वैष्णवी धायगुडे, राजवर्धन आबुज, हर्षवर्धन आबुज या विद्यार्थ्यांनी माहिती सांगितली.

अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या आजही जगप्रसिद्ध आहे. ते पेशाने वकील होते, त्यांना समाजसेवेची आवड होती त्याबरोबरच ते पत्रकार होते. प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले उपेंद्र लांडे यांनी मनोगत व्यक्त केले तसेच अध्यक्ष म्हणून लाभलेले मयुरेश गुळवे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. आभार प्रदर्शन आरोही तौर यांनी केले. या कार्यक्रमासाठी मा. डॉ.सीमाताई जोशी, ॲड . अर्चनाताई तुंगार, गंगाधर जी देशमुख सर, श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले . हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी सर्व सहकारी शिक्षक वृंद यांचे सहकार्य लाभले आणि उत्तमरित्या कार्यक्रमाचे सादरीकरण झाले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# समरसता साहित्य संमेलनाला ग्रंथदिंडीने प्रारंभ

## साहित्याचे समाजात प्रतिबिंब उमटत असते : पद्मश्री नामदेवराव कांबळे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २ ऑगस्ट -**

समरसता हा जगण्याचा विषय असून साहित्यात समाजाचे प्रतिबिंब उमटत असते. परिवर्तनासाठी प्रवर्तन आवश्यक असते. समरसतेवर आधारित जीवनमूल्यांशी बांधिलकी मानणारे, समाजनिष्ठ साहित्य निर्मिती करणे ही काळाची गरज आहे. त्यामुळेच भारत हे अधिक सुदृढ व शक्तिशाली राष्ट्र होऊ शकते. यासाठी व्यापक प्रमाणावर समाज प्रबोधन होणे ही काळाची गरज आहे. समरसता साहित्य संमेलनामधून सामाजिक समस्येसाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याचा अनुबंध निर्माण होईल असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री नामदेवराव कांबळे यांनी नांदेड येथील विसाव्या समरसता साहित्य संमेलनात व्यक्त केले.



समरसता साहित्य परिषद, महाराष्ट्र यांच्या वतीने नांदेड येथे विसावे समरसता साहित्य संमेलनाला सकाळी आठ वाजता भव्य ग्रंथदिंडीने प्रारंभ झाला. यावेळी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त, ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री नामदेव कांबळे, संमेलनाचे उद्घाटक तथा समरसता साहित्य परिषदेचे संस्थापक सदस्य प्रा रमेश महाजन, नांदेड उत्तरचे आमदार बालाजी कल्याणकर, बाबा सतनामसिंग, संमेलनाचे पूर्व अध्यक्ष साहित्यिक अक्षयकुमार काळे, स्वागताध्यक्ष खासदार डॉ. अजित गोपछडे, कार्यवाह माणिक भोसले, निमंत्रक शिवा कांबळे, अभिनव भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब पांडे तसेच ज्ञानभारती विद्यामंदिर चे अध्यक्ष प्रा.बालाजी वाकोडे पाटील, समरसता साहित्य परिषदेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. ईश्वर नंदापुरे ,कार्यवाह डॉ. प्रसन्न पाटील यांची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी पद्मश्री गिरीश प्रभुणे, पद्मश्री भिकुजी दादा इदाते, प्रा रमेश पांडव, पूर्व संमेलन अध्यक्ष प्रा शेषराव मोरे, गोविंद नांदेडे या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ प्रसन्ना पाटील यांनी करताना समरसता हा पांडित्याचा विषय नसून अनुभूतीचा विषय आहे असे सांगितले.

संमेलनाचे कार्यवाह माणिक भोसले यांनी बोलताना नांदेड शहरातील सर्वच स्तरातील नागरिकांनी विभाजन व कार्यकर्त्यांनी या संमेलनाच्या आयोजनासाठी भरीव योगदान दिल्यामुळेच हे भव्य- दिव्य स्वरूपातील साहित्य संमेलन घेणे शक्य झाले असे सांगितले.

संमेलनाचे स्वागत अध्यक्ष डॉ .अजित गोपछडे म्हणाले, या संमेलनामध्ये बहुविविधतेची लोकसंस्कृती सहभागी झाल्याबद्दल अभिनंदन केले. मानवी जीवनामध्ये उदात्त जीवनमूल्ये निर्माण करणारे साहित्य निर्माण व्हावे.

यावेळी बोलताना डॉ रमेश महाजन म्हणाले नांदेडकरांनी समरसता साहित्य संमेलन हे एका उंचीवर नेऊन ठेवले आहे. त्यामुळे भविष्यातील समरसता साहित्य संमेलने कशी घ्यावीत यासाठीचा माइल स्टोन या संमेलनाने निर्माण केला आहे. समरसतेचा प्रवाह अधिक जोमदार होण्यासाठी या संमेलनातून साहित्यिकांना प्रेरणा मिळेल. समरसतेचा प्रवाह अधिक जोमदार व समाजव्यापी, राष्ट्रव्यापी होईल.

यावेळी बोलताना अक्षयकुमार काळे म्हणाले, साहित्यकृतीच्या सखोल चिकित्सेसाठी व समरसतेच्या विचारांना बांधीलकी असणाऱ्यांना या साहित्य संमेलनातून प्रेरणा व मार्गदर्शन मिळावे. भावनिक व मानसिक पातळीवर एकात्मता निर्माण करणे म्हणजे समरसता होय.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.गजानन होडे व डॉ. रमा गर्गे यांनी केले. प्रारंभी ज्ञान भारती विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. समरसता साहित्य संमेलनाच्या स्मरणिकेचे समरसता साहित्य पत्रिकेचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

तसेच दोन दिवशीय साहित्य संमेलनामध्ये मुलाखती परिसंवाद व गझल मुशायरे, मान्यवर कवींचे कवी संमेलने, चर्चासत्रे यांचे आयोजन करण्यात आले आहे.

संमेलनाचा समारोप दिनांक ३ ऑगस्ट रविवार रोजी दुपारी चार वाजता राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष किशोर मकवाणा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार आहे.

# गोदावरी अर्बनचे यश ग्राहकांच्या विश्वासामुळेच : मंत्री शिवेंद्रसिंह भोसले

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २ ऑगस्ट -**

गेल्या बारा वर्षात सहकार क्षेत्रात अल्पावधीतच गोदावरी अर्बनने आपली यशाची भरारी कायम ठेवण्या मागच्या यशाचे गमक हे ग्राहकांचा विश्वास संपादन केल्यामुळेच मिळाले आहे असे मत राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांनी व्यक्त केले.

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले हे दोन दिवसांच्या नांदेड दौऱ्यावर आले असता आज (दि.१) रोजी त्यांनी गोदावरी अर्बनच्या सहकारसूर्य मुख्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी गोदावरी अर्बनच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला व तसेच मंत्री महोदयांना छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अर्धाकृती पुतळा भेट देण्यात आला. यावेळी शुभेच्छारुपी संदेश देताना मंत्री महोदय बोलत होते. ते म्हणाले की,अत्यंत कमी कालावधीत गोदावरी अर्बनच्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे. हे होण्यामागे संस्थेचे संस्थापक आ.हेमंत पाटील,अध्यक्ष राजश्री पाटील यांची प्रचंड मेहनत आणि कर्मचाऱ्यांची ग्राहकांना तत्पर सेवा यामुळे संस्थेची आजवरची ही वाटचाल यशस्वी झाली असून पुढेही ही वाटचाल सुरूच राहील यात दुमत नाही. शिवाजी महाराजांचा अर्धाकृती पुतळा ही आजवरच्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय आणि मोठी भेट आहे. राजे सहकार क्षेत्रातील



अभ्यासू आणि जाणकार व्यक्तीमत्व आहेत. त्यांच्या वडिलांपासून घराण्याला सहकाराचा वारसा आहे. यावेळी त्यांनी गोदावरी अर्बनद्वारे चालविल्या जाणाऱ्या आर्थिक सक्षमीकरणाच्या योजनांच्या आढावा घेतला व ग्रामीण तसेच शहरी भागात आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सेवा देणाऱ्या संस्थेच्या अचूक प्रणालीचे कौतुक केले.

सहकार क्षेत्रात कार्य करताना पतसंस्था मोठ्या होण्यासाठी सर्वात महत्वाचा असतो तो ग्राहकांचा विश्वास आणि तोच गोदावरी अर्बनने मिळविला आहे असे मला वाटते असेही ते म्हणाले आणि गोदावरी अर्बनच्या आजवरच्या कार्याचा गौरव करून शुभेच्छा दिल्या. यावेळी मंत्री महोदयांच्या हस्ते आंबेडकरी चळवळीचे जेष्ठ नेते सुरेशदादा गायकवाड व आ.आनंदराव बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी व्यासपीठावर आ.बाबुराव कदम कोहळीकर, खा.अजित गोपछडे, भाजपचे प्रविण साले, गोदावरी अर्बनचे सचिव ड.रवींद्र रगटे, संचालक प्रा.सुरेश कटकमवार, अजय देशमुख सरसमकर, सदाशिव पुंड यांच्यासह कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### तपोभूमी येथील भंतेजींच्या निवास कुटीला अचानक आग

**लोहा-** गोळेगाव तालुका लोहा येथील तपोभूमी येथे बौद्ध भंते बोधिधम्मो हे अनेक वर्षांपासून वास्तव्यास आहेत २४जुलै रोजी मध्यरात्री भंतेजी राहत असलेल्या निवास कोटीला अचानक आग लागली. या आगीमध्ये विविध वस्तू जळून खाक झाल्या. या घटनास्थळी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकाऱ्यानी भेटी देऊन सांत्वन केले. भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी तपोभूमीला भेट देऊन भंतेजींना धम्मदान दिले. गोळेगाव येथील तपोभूमीत अनेक वर्षापासून भंते बोधीधम्मो शिष्यासह वास्तव्यात असतात. दर महिन्याच्या पौर्णिमेला या ठिकाणी बौद्ध बांधव या ठिकाणी येतात २४ जुलै मध्यरात्रीला भंतेजी राहत असलेल्या निवास कुटिला आग लागली. या आगीत वाचनीय पुस्तके, जीवन आवश्यक वस्तू, जळून खाक झाल्या घटना घडल्याचे बाब समोर आल्यानंतर ३० जुलै रोजी भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी तपोभूमीला भेट देऊन भंतेजीना धम्मदान दिले. यावेळी एकनाथरावजी पवार लोहा कंधार ,कंधार दक्षिणचे मंडळाध्यक्ष ड .विजयकुमार धोंडगे, उत्तर मंडळाचे अध्यक्ष बालाजीराव पंडागळे, लोहा उत्तर मंडळ अध्यक्ष शरद पाटील पवार, कंधार पंचायत समितीचे सदस्य उत्तम चव्हाण,नागोराव पाटील मोरे, भरत पाटील चिखलीकर, गणेशराव पाटील इंगळे, हौसाजी वाघमारे, पंढरी वाघमारे यांची उपस्थिती होती भारतीय बौद्ध महासभे पि.एम.वाघमारे, रत्नाकर महाबळे, बापुसाहेब कापुरे, धोंडीबा यानभुरे,ग्रिस भालेराव, सुभाष खाडे,गोडबोले कंधारचे राजकुमार कोकाटे यांनी भेट देऊन सांत्वन केले.भंतेजीच्या निवास कुटीचे अचनक आगीत नुकसान झाले त्या निवास कुटी ची उभारणी करुन देण्याचे आश्वासन दिले.




### डॉ. अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी अनिल डोईफोडे

**भोकर-**भोकर येथे दि.०१ ऑगस्ट २०२५ रोजी साहित्यरत्न डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागी ध्वजारोहण करण्यात आले भोकर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामजी कराड व यांच्या हस्ते ध्वजारोहण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले तर क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या नियोजित जागेवर भोकर तहसीलचे तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्या हस्ते लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून ध्वजारोहण करण्यात आले यावेळी असंख्य सामाजिक कार्यकर्ते समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी भोकर तालुक्याचे भोकर नगर परिषदेचे माजी नगरसेवक मनोज गिमेकर, माजी नगरसेवक प्रतिनिधी तथा नगरपरिषद कर्मचारी सामाजिक कार्यकर्ते दिलीप वाघमारे सखाराम वाघमारे शिवसेनेचे संतोष आलेवाड नामदेव वाघमारे ज्येष्ठ संपादक उत्तम बाबळे लोकमतचे पत्रकार राजेश वाघमारे लसाकमाचे माजी तालुका अध्यक्ष निवृत्त कर्मचारी माहूरकर अण्णा कॉम्रेड दिलीप पोत्रे सामाजिक कार्यकर्ते के.वाय देवकांबळे उद्योजक सखाराम वाघमारे बबलू काळे बालाजी काळे महेंद्र किनीकर चंद्रकांत बाबळे अविनाश वाघमारे परमेश्वर भालेराव गंगाधर करंदीकर असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ध्वजारोहणाच्या नंतर लागलीच नवनिर्वाचित अध्यक्षाची निवड करण्यात आली यावेळी सर्वानुमते सार्वजनिक जयंती मंडळ भोकरच्या अध्यक्षपदी सर्व समाजाच्या वतीने पत्रकार अनिल डोईफोडे यांची निवड करण्यात आली व उपाध्यक्षपदी गंगाधर करंदीकर सचिव बबलू काळे कोषाध्यक्ष बालाजी वाघमारे सहसचिव के. वाय. देवकांबळे सह कोषाध्यक्षपदी महेंद्र किनिकर व सदस्य संतोष सूर्यवंशी संतोष झुंजारे सुधीर वाघमारे लक्ष्मण सुरेशकर सल्लागार सखाराम वाघमारे आदी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आले.



### महाराष्ट्र राज्य परीट सेवा मंडळाच्या तालुका उपाध्यक्षपदी बालाजी इबितदार

**बाऱ्हाळी** -महाराष्ट्र राज्य परीट( धोबी )सेवा मंडळाच्या वतीने नुकतीच कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून यात मुखेड तालुका उपाध्यक्षपदी निवळी येथील तरुण कार्यकर्ते बालाजी ईबितदार यांची निवड करण्यात आली आहे .ही निवड जिल्हा अध्यक्ष दिगंबर तमलूरकर ,जिल्हा सचिव दत्ता शिल्लेवाड, जिल्हा कार्याध्यक्ष दत्ता येवले सलगरकर यांनी केली आहे. बालाजी ईबितदार यांच्या निवडीचे तालुक्यातून अभिनंदन होत आहे.



# अध्यात्म भगवत प्राप्तीचे साधन आहे : केशव सारंग महाराज

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, दि. २ ऑगस्ट -**

हिमायतनगर शहरातील परमेश्वर मंदिरात श्रावण मासानिमित्त भव्य अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविक या भक्तीमय सोहळ्याची पर्वणीचा लाभ भाविकभक्त मोठ्या भक्ती भावाने घेत आहेत. दिनांक २७ जुलै रोजी परमपूज्य विदर्भ केशव श्री सारंग महाराज अमरावतीकर यांच्या सुश्राव्य वाणीतून संगीतमय श्रीमद् भागवत कथेस प्रारंभ झाला असून ही भागवत कथा दोन ऑगस्ट पर्यंत दुपारी दोन ते पाच या कालावधीत संपन्न होत असून पाच वाजता भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन विविध भाविक भक्तांमार्फत मंदिर समितीतर्फे करण्यात आले आहे .दिनांक २९ रोजी श्री भागवत कथा सांगत असताना श्री सारंग महाराज म्हणाले की साधना फक्त प्रापंचिक अडचणी दूर करण्यासाठी नाही. प्रपंचातील अडचणी कधी संपत नसतात. आज काही संकटे दूर झाली तर उद्या नवीन संकटे निर्माण होत असतात. हे ईश्वरनिर्मित निसर्गचक्र चालणारच आहे .प्रपंच नाशवंत आहे तर परमार्थ हा शाश्वत आहे .या शाश्वत परमार्थाची प्राप्ती व्हावी भगवंताशी एकरूपता प्राप्त करून घ्यावी यासाठी निष्काम ईश्वर भक्तीची आवश्यकता आहे. निष्काम व निस्वार्थ ईश्वर भक्ती करण्याकरता आपल्या अंतः करणातील काम, क्रोध, लोभ, मध, मोह, मत्सर नष्ट करून अंतकरण शुद्ध ठेवावे लागेल . परमार्थासाठी सावधानता पाहिजे सात्विक माणसाच्या संगतीत राहून ती काही प्रमाणात निश्चित प्राप्त होते . सात्विकता चिरकाल प्राप्त करायचे असेल तर भगवंताशी नाते जोडावे त्याच्या निरंतर ध्यास करावा लागेल. त्याची प्राप्ती होणे यातच मानवाचे खरे हित सामावलेले आहे. भगवंताशी एकरूपता प्राप्त होण्यासाठी ऋषी मुनी साधुसंतांनी योग्य प्रकारे साधना, उपासना करण्याचे मार्ग दाखविले आहेत. त्या मार्गांचे अनुसरून केल्यास निश्चितपणे मानव जन्माचे सार्थक होऊन मानवास जीवन जगण्याची योग्य दिशा मिळेल .असे केशव भागवताचार्य श्री सारंग महाराज यांनी भागवत कथा सांगत असताना मार्गदर्शन केले आहे.



# विष्णुपुरी येथील पशुवैद्यकीय दवाखाना छत बांधकामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १ ऑगस्ट -**

जिल्हा नियोजन समितीच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) निधीतून विष्णुपुरी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या नुतन इमारतीच्या छत बांधकाम कामाचा शुभारंभ जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. राजकुमार दि.पडीले यांच्या हस्ते व सरपंच सौ. संध्या विकास देशमुख व राजु हंबर्डे यांच्या उपस्थितीत करण्यात आला आहे,या बांधकामा मुळे नवीन अद्यावत इमारत तयार होणार आहे.

विष्णुपुरी येथील पशुवैद्यकीय दवाखाना अंतर्गत विष्णुपुरी , पांगरी, धनगरवाडी,खुपसरवाडी,कल्लाळ, मार्तंड, पिंपळगाव निमजी,गंगाबेट, व भनगी ,राहेगाव,वाहेगाव,भायेगाव,किक्की,काकांडी, या १४ गावाचा समावेश असुन गेल्या अनेक वर्षांपासून जागा असुन इमारत नसल्याने पशुसंवर्धनची गैरसोय होत असल्याने भव्य इमारतीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा यासाठी सतत पाठपुरावा ग्रामपंचायत सरपंच प्रतिनिधी राजु हंबर्डे यांनी केली होती.



अखेर इमारत निधी बाबत जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून जवळपास रु. ७० लाख निधीतून भव्य इमारत पशुवैद्यकीय दवाखाना जागेत गेल्या मार्च महिन्यात बांधकामाला सुरुवात झाली यात ५ खोल्यासह रंगरंगोटी,विद्युत व्यवस्था असुन आकर्षक डिझाईन मध्ये इमारत तयार होणार आहे.या इमारत स्लॅबचा भुमी पूजन दि.१आगस्ट रोजी उपायुक्त डॉ.राजकुमार पडिले यांच्या हस्ते तर सरपंच सौ.संध्या विलास हंबर्डे व डॉ. प्रवीणकुमार घुले ,सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन नांदेड तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ.अविनाश बुन्नावार, उपसरपंच विश्वभर हंबर्डे, ग्रामपंचायत अधिकारी संजय कानडे, मुख्याध्यापिका उज्वला जाधव, पशुधन पर्यवेक्षक योगेश डोंगरे, संतोष हंबर्डे ,उग्रसेन हंबर्डे ,कालिदास बारसे, यांच्या सह गावकरी उपस्थित होते.

# भाजपाच्या नूतन कार्यकारणी पदाधिकाऱ्यांचा आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. २ ऑगस्ट -**

भाजप किनवट कार्यकारणीच्या विविध पदावर नव्याने निवड करण्यात आलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



आगामी स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचे आमदार भीमराव केराम यांच्या नेतृत्वाखाली भाजपा किनवट तालुका दक्षिण विभागाचे तालुका अध्यक्ष सूर्यकांत आरंडकर यांनी भाजपा किनवट तालुका दक्षिण विभागाच्या विविध पदावर नवीन कार्यकारणी घोषित करत भाजपा युवा मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी सुरज लासिनकर, महिला मोर्चाच्या युवा अध्यक्षपदी प्रतीक्षा नरोटे, किसान आघाडीच्या तालुका अध्यक्षपदी बामनाजी मेटकर, अनुसूचित जमाती मोर्चाच्या अध्यक्षपदी कोंढबा वानोळे, ओबीसी आघाडी मोर्चाच्या अध्यक्षपदी अनिल मोहिते, अनुसूचित जाती अध्यक्षपदी संदीप पानपत्ते अल्पसंख्यांक आघाडी अध्यक्षपदी अहमद सिद्दिकी, भाजपा तालुका सरचिटणीस पदी कपिल करेवाड, भाजपा तालुका उपाध्यक्षपदी बालाजी पळसपुरे, तर चिटणीस पदी रमेश बोडेवाड, कोषाध्यक्षपदी सत्यनारायण पोगुलवार, नंदकिशोर कुमार, अशा विविध पदावर पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

नव्याने निवड करण्यात आलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते आज इस्लापूर येथील विश्रामगृह येथे सत्कार करण्यात आला असून आगामी संस्था निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सर्व पदाधिकाऱ्यांनी कामाला लागावे असा सल्ला आमदार भीमराव केराम यांनी नव्याने पदावर निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना दिलाय.

यावेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, विधानसभा प्रमुख बाबुराव केंद्रे, आदिवासी आघाडीचे नेते गोविंद अंकुरवाड, भाजपा किनवट दक्षिण विभागाचे तालुका अध्यक्ष सूर्यकांत आरंडकर, भाजपा युवा जिल्हा सरचिटणीस स्वप्निल गरडे, इस्लापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सूर्यनारायण पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र घोगरे पाटील, भाजपाचे भगवान हुरदूके, माधवराव ढोकळे रवी कसबे, बालाजी काळे, बंटी फड, संतोष पेळे, दिगंबर आडे, सूर्यकांत बोधनकर अजित टेलर शिवशंकर मुंडे, शेख लतीफ यांच्यासह भाजपाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरुद्वारा चौरस्ता येथील लोखंडी उड्डाणपूल हटविण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २ ऑगस्ट -**

गुरुतागद्दी कार्यक्रम २००८ दरम्यान गुरुद्वारा चौरस्ता ते जी.जी रोड येथे लोखंडी पाचारी पूल निर्माण करण्यात आला होता. सदर पूल आता रहदारीस वापरात नसल्याने व जीर्ण झाल्याने यामुळे मोठी जीवित हानी होण्याची शक्यता असल्याने हा धोकादायक लोखंडी पूल हटवावा अशी मागणी शीख समुदाय समन्वय समिती व अल्पसंख्याक विभाग महाराष्ट्रचे सदस्य अमरजीतसिंघ कुंजीवाले यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांना नांदेड येथील दौऱ्या दरम्यान निवेदनाद्वारे केली आहे.

सिख धर्मियांची दक्षिणकाशी मानल्या जाणाऱ्या नांदेड सचखंड गुरुद्वारा येथे शीख धर्मीयांचे दहावे गुरु श्री गुरुगोविंदसिंघजी महाराज यांची ३०० वा गुरुतागदी कार्यक्रम २००८ साली साजरा करण्यात आला. प्रचंड गर्दी लक्षात घेऊन रहदारीस अडथळा येऊ नये म्हणून गुरुद्वारा चौरस्ता ते जी.जी रोड येथे लोखंडी पादचारी उडानपूल बांधण्यात आला होता. हा लोखंडी पादचारी उडानपूल १७ वर्षांपूर्वी बांधण्यात आला आहे. त्यामुळे सदर पूल पूर्णतः मोडकळीस आला असल्याचे निवेदनात नमुद केले आहे.

यावेळी रणजीतसिंघ गिल, गुरुदीपसिंघ संधू, गुरप्रितसिंघ सौखी, जसपालसिंघ लांगरी, पवितसिंघ आरतीया, हरप्रितसिंघ मेजर, जसदीपसिंघ बुंगई, हरप्रितसिंघ पुजारी, हरमोहनसिंघ चौव्हाण यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



**माहूर- पंचायत समिती येथील कै.वसंतराव नाईक सभागृह येथे १ ऑगस्ट. रोजी महसूल दिनानिमित्त तहसीलदार मुगाजी काकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचे व निवडणूक नायब तहसीलदार कैलास जेठे, पुरवठा नायब तहसीलदार राऊत यांचे हस्ते नागरिकांना विविध प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. गुणवंत पाल्य तसेच महसूल अधिकारी, कर्मचारी यांचा गौरव करण्यात आला.**

# प्रशासनाला हाताशी धरून अवैधरित्या मोबाईल टॉवरची उभारणी; जनतेचा विरोध

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. २ ऑगस्ट -**

प्रशासनाला हाताशी धरून अवैधरित्या मोबाईल टॉवर उभारणी करण्याची एका खाजगी कंपनीने एकेरी निर्णय घेत टावर उभारणीच्या कामास सुरुवात करण्यात आले आहे संबंधित टॉवरची मंजुरी एका व्यक्तीच्या नावे असून त्यासाठी लागणारी जागा इतर दुसऱ्या मालकीची आहे. सदरील टावर ला परिसरातून सर्वांचा विरोध असतानाही पोलीस प्रशासनाची दिशाभूल करून टॉवरचे काम सुरू करण्याचा एकेरी निर्णय खाजगी कंपनी घेत असल्याने माजी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी विरुद्ध दर्शवला आहे

धनेगाव मुजाम पेठ येथील जय हनुमान सोसायटीच्या नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालय धनेगाव, नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे, जिल्हाधकारी कार्यालय नांदेड यांच्याकडे एका निवेदना मार्फत करण्यात आले आहे. सदरील मोबाईल टॉवर उभारणीस धनेगाव /मुजामपेट ग्रामपंचायत व परीसराती नागकानी विरोध केला आहे. सदरील खाजगी कंपनी ही सर्वांच्या विरोधात जाऊन टावर उभारणी साठी पोलीस प्रशासनाची मदत घेऊन अवैधरित्या मोबाईल टॉवरची उभारणी करत असल्याने माझी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी कायदेशीर रित्या या कंपनीचे कुठलेही परवानगी नसल्याने त्यांनी हातावर येतो स्थलांतरित करण्यात यावा असे सांगण्यात आले. धनेगाव ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत जय हनुमान सोसायटी मध्ये भर वस्तीत मोबाईल टावर उभारणी करण्यासाठी धनेगाव ग्रामपंचायत व परिसरातील नागरिक यांचा मोठा विरोध आहे. सदरील खाजगी कंपनीचे अधिकारी कोणालाही न जुमानता टॉवरच्या उभारणीसाठी खोदकाम केल्याने तेथील निघालेली मुरूम हे शेजारच्या प्लॉटमध्ये टाकून तेथील नागरिकांना राहण्यास अडथळा निर्माण या टावर कंपनीने केला आहे .

सदरील मोबाईल टावर उभारणीचा प्रश्न न्यायप्रविष्ठ असल्याने न्यायालयाने मान्यता दिल्याशिवाय येथे कुठलीही खोदकाम करू नये असे मत माजी जि प सदस्य म्हणून पाटील शिंदे यांनी पोलीस प्रशासनात सांगितले.